१
रमजान मुबारक
आज का इफ्तार
६.३६
कल की सहेर
५.२५

**पार्श्वभूमी**

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ९० वा फोन २३०१०१ दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 | RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्येही आता स्वीकृत सदस्य कार्यकर्त्यांना ॲडजेस्ट करण्यासाठी भाजपची नवीनच खेळी

बीड दि.२६ (प्रतिनिधी):– राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये आता स्वीकृत सदस्य नेमले जाणार आहेत, राज्य सरकारने हा निर्णय घेतला असून याला मंत्री मंडळानेही हिरवा कंदील दाखविला आहे. यापुढे राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये एकूण सदस्य संख्येच्या १०% तर पंचायत समित्यामध्ये एकूण सदस्य संख्येच्या २०% स्वीकृत सदस्य नेमले जाणार आहेत. आजपर्यंत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमण्याचे प्रावधान नव्हते, या निर्णयामुळे भारतीय जनता पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांना ॲडजेस्ट करण्यासाठी ही नवी खेळी खेळली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

### निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्यांना संधी

ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल, या उद्देशाने महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता इच्छुक कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सभागृहात बसण्याची संधी मिळणार असल्याचे निश्चित झालं आहे.

### जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य; कॅबिनेट बैठकीत शिक्कामोर्तब, संख्या किती?

राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत पान २ वर

# मतदान अनिवार्य करणे गरजेचे

■ सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे भाष्य ■

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसेवा):- देशातील लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदान सर्वांसाठी अनिवार्य करण्याबाबत विचार करण्याची गरज आहे, असे मत



सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले असून, यामागील उद्देश शिक्षा करणे नसून जास्तीत जास्त नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करून घेणे हा असावा, असेही नमूद केले आहे. पान २ वर

**लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदानाची टक्केवारी वाढणेआवश्यक**

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक सुधारणांबाबत एका जनहित याचिकेवर (पीआयएल) सुनावणी करताना महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने म्हटले की, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदानाची टक्केवारी वाढवणे आवश्यक आहे. विशेषतः सुशिक्षित आणि संपन्न वर्गातील लोक मतदानाला कमी बाहेर पडतात, यावरही न्यायालयाने बोट ठेवले आहे.

# सुप्रीम कोर्टाने वाल्मिक कराडचा जामिन फेटाळला

बीड दि.२६ (प्रतिनिधी):- केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक



कराडला मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने कराडचा जामिन अर्ज फेटाळून लावत सुनावणीस नकार दिला आहे. न्यायमूर्ती एम.एम.सुंदरेश यांच्या समोर गुरुवारी कराडच्या अर्जावर सुनावणी झाली. दरम्यान सरकारी वकील ॲड.उज्वल निकम आणि ॲड.बाळासाहेब कोल्हे यांनी बीड जिल्हा न्यायालयात कराडला जामिन मिळू नये म्हणून युक्तिवाद केला होता. सदरील युक्तिवाद मान्य करत न्यायालयाने त्याचा जामिन अर्ज फेटाळला होता. याच निर्णयाविरुद्ध वाल्मिक कराडने वकिलामार्फत जामिनसाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. पान २ वर

# पाणी पुरवठ्याच्या नियोजनाविषयी अनुभवी नगर सेवकांनी आग्रही भूमिका मांडावी

**बीड दि.२६ (प्रतिनिधी):– बीड शहरातील पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुभवी आणि जुन्या नगरसेवकांनी नगर पालिकेच्या आजच्या सर्वसाधारण सभेत आग्रही भूमिका मांडावी, शहराचा झालेला विस्तार, उपलब्ध पाण्याच्या टाक्या, जलशुद्धीकरण केंद्र, मुख्य पाईप लाईनची अवस्था, ब्लिचींग पावडर आणि तुरटीचा वापर यासह मेनलाईनवरील अनधिकृत नळ कनेक्शन या विषयीचे मुद्दे उपस्थित करुन त्यावर उपाययोजना करण्यासाठी सभागृहात पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच शहरवासियांना वेळेवर शुद्ध पाणी पुरवठा करणे शक्य होईल.**

बीड शहरात पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत परंतु एकही उंच टाकी नाही. यामध्ये अमृतजल योजनेसाठी किल्ला मैदान परिसरातील डाकबंगला येथे उंच टाकीचे नियोजन ठरले होते परंतु काही विघ्नसंतोषी लोकांनी हे काम होऊ दिले नाही. बीड शहराची पाईप लाईन १९५८ साली झालेली असून जलशुद्धिकरण केंद्रासह फिल्टर पॉइंट १९७० साली झालेला आहे. शहरातील मुख्य पाईप लाईन जुनी असल्याने त्यावरील नळ कनेक्शन जो वरील भाग असेल तो क्लिअर दिसतो परंतु खाली खोलवर पान २ वर

### पाईप लाईनची स्थिती नगर सेवकांनी तपासावी

प्रत्येक विभागात सुरुवातीला नळाला घाण पाणी येते, त्यावर सुद्धा संशोधन होणे आवश्यक असून मुख्य पाईप लाईनवरील अनधिकृत नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई हाती घेणे महत्वाचे आहे. सध्या बीड शहरात काविळ आणि गॅस्ट्रोची साथ सुरु असून त्या करिता पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासणीसाठी पाठविणे आवश्यक आहेत. हे सर्व मुद्दे अनुभवी नगरसेवकांनी सभागृहात मांडावेत, पाईप लाईनची अवस्था कशी आहे हे देखील एकदा तपासले पाहिजे अशी भूमिका देखील मांडावी जेणेकरुन बीड शहरास पाणी पुरवठा करतांना येणारा व्यत्यय दूर करता येऊ शकतो किंवा त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करता येणे सहज शक्य होईल.

आ.संदीप क्षीरसागरांनी मांडली होती लक्षवेधी

# बीडमधील बोगस गुंठेवारी, लेआउटची जिल्हाधिकारी करणार चौकशी

बीड दि.२६ (प्रतिनिधी):- आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील बोगस गुंठेवारी, ले-आऊट प्रकरणात मोठ्या प्रमाणात



भ्रष्टाचार झाल्याची लक्षवेधी पावसाळी अधिवेशनात मांडली होती. त्याची शासनाने दखल घेतली असून महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिवांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली आहे. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांसह समितीने तात्काळ स्थळ पाहणी करुन स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. बीड येथील आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगर परिषदेच्या हद्दीतील सर्व्हे नंबर २९ तरफ माळी, सर्व्हे नंबर १९४ तरफ बलगुजर, सर्व्हे नंबर १९७, १९८, १९९ तरफ खोड, सर्व्हे नंबर ५३ (आरक्षण क्र.१३१), ५६,५९ (आरक्षण क्रमांक १३३), १७३ तरफ बलगुजर, सर्व्हे नंबर ३४, ३५, ६८, ६९, ७९ तरफ गिराम, सर्व्हे नंबर १८८ (आरक्षण क्रमांक ३७) तरफ पिंगळे, सर्व्हे नंबर १६ पान २ वर



# मुंबईत माझ्याविरोधात स्टिंग ऑपरेशनचा कट रचला जातोय

### मनोज जरांगे पाटील यांचा आरोप

हिंगोली दि.२६ (वृत्तसेवा):- माझ्या विरोधात कट रचला जातोय, कारण काय तर मी गरिबांसाठी काम करतोय. मंत्रालयात स्टिंग ऑपरेशन सुरू आहे, असा खळबळजनक दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. हिंगोलीच्या कामठा फाटा येथे आयोजित शिवजयंतीच्या कार्यक्रमात बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी हा आरोप केला आहे. मात्र आपणही काही कमी नाही असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी नाव न घेता इशाराही दिला आहे. मात्र मनोज जरांगे यांच्या या दाव्याने एकच खळबळ उडाली असून त्यांचा रोख नेमका कोणाकडे आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पान २ वर



# बांधकाम विभागाने न.प.ला कोणतीही सूचना न देता बार्शी नाका चौक तोडून टाकला

### नगर पालिकेने कारवाई करावी –खुर्शीद आलम

**बीड दि.२६ (प्रतिनिधी):– शहरातील बार्शी नाका येथील चौक बांधकाम विभागाने नगर पालिकेला कोणतीही सूचना किंवा कल्पना न देता तोडून टाकल्याचा आरोप तुतारी गटाचे गटनेते खुर्शीद आलम यांनी केला आहे. बार्शी नाका चौकाच्या सुशोभीकरणावर नगर पालिकेने लाखो रुपये खर्च केलेले आहेत तरीही बांधकाम विभागाने नगर पालिकेची परवानगी न घेता हा चौक तोडून टाकल्याने संबंधितांवर नगर पालिकेने कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी खुर्शीद आलम यांनी केली आहे.**

बीड शहरातील बार्शी नाका चौक हा अतिशय महत्वाचा आहे. या ठिकाणी नगर पालिकेने चौक तयार करुन विद्युत मोटारीच्या माध्यमातून पाण्याचे कारंजे लावले होते. हायमास्ट दिवे देखील बसविले होते. रंगीबेरंगी लाईट लावण्यात आल्या होत्या. चौफेर लोखंडी जाळ्या बसविण्यात आल्या होत्या. त्यामुळे हा चौक नेहमी चकाचक दिसायचा. नगर पालिकेने या चौकाच्या सुशोभीकरणावर लाखो रुपये खर्च केलेले आहेत. बीड शहराच्या वैभवाचा एक भाग म्हणून बार्शी नाका चौकाचा उल्लेख होतो. मात्र बांधकाम विभागाने रोडचे काम करत असतांना नगर पालिकेला कसल्याही प्रकारची सूचना किंवा कल्पना न देताच बार्शी नाका चौक तोडून टाकला आहे. बांधकाम विभागाचे अभियंता इंजि.भोपळे आणि संबंधीत गुत्तेदाराला चौक तोडण्याचा



अधिकार कोणी दिला असा प्रश्न खुर्शीद आलम यांनी उपस्थित केला आहे. गेल्या १०-११ वर्षापुर्वी नगर पालिकेने बार्शी नाका चौकाला मिसाईल मॅन तथा माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे नाव दिल्याचा ठराव सर्व संमतीने मंजूर केलेला आहे. चौकाचे अधिकृत सुशोभीकरण करुन त्याला नाव देखील देण्यात आले होते. त्यामुळे बांधकाम विभागाने चौक तोडण्यापुर्वी नगर पालिकेला सूचना देणे पान २ वर

# देशात 'ई-२०' इथेनॉलची विक्री १ एप्रिलपासून बंधनकारक



### केंद्र सरकारचा निर्णय

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसेवा):- केंद्र सरकारने येत्या १ एप्रिलपासून सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २० टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिश्रित (ई-२०) आणि किमान रिसर्च ऑक्टेन नंबर (आरओएन) ९५ असलेल्या पेट्रोलची विक्री बंधनकारक केली आहे.

तेल मंत्रालयाने १७ फेब्रुवारी रोजी काढलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, केंद्र सरकार यानुसार निर्देश देते की, तेल कँपन्यांनी ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डसच्या मानकांनुसार २० टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिश्रण असलेले आणि किमान आरओएन ९५ असलेले मोटार स्पिरिट (पेट्रोल) सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत विक्रीस ठेवावे. विशेष परिस्थितीत, ठरावीक प्रदेशांसाठी आणि मर्यादित कालावधीसाठी केंद्र सरकार अपवाद मंजूर करू शकते. इथेनॉल ऊस, मका किंवा धान्यापासून तयार होते. ते नवीकरणीय, देशांतर्गत उत्पादित असून शुद्ध पेट्रोलपेक्षा अधिक स्वच्छ जळते. तेल आयात कमी करण्यासह उत्सर्जन घटवण्यासाठी सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण बंधनकारक केले आहे. या निर्णयामुळे ऊस, मका पान २ वर

॥ श्री मन्मथस्वामी प्रसन्न ॥ रजि. नं. ए-986



**श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी**

श्रीक्षेत्र कपिलधार, ता.जि.बीड-431122

**जाहीर सूचना**

संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान पंचकमिटी, श्री क्षेत्र कपिलधार (ता. जि. बीड) यांच्यामार्फत कळविण्यात येते की, संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान मंदिर परिसर व देवस्थानच्या मालकीच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे विवाह सोहळे आयोजित करणे, अनधिकृत बांधकाम करणे, तसेच बेकायदेशीर बॅनर, पोस्टर, फलक किंवा जाहिरात साहित्य लावणे यास सक्त मनाई करण्यात येत आहे. सदर निर्णय देवस्थान परिसराची पावित्र्यता, सुव्यवस्था व कायदेशीर हक्क अबाधित राखण्यासाठी घेण्यात आलेला आहे. यापुढे नमूद मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा संबंधितांविरुद्ध लागू कायद्यांनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/अध्यक्ष
श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी
श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड 431122

# पोलीस पाटील भरतीमधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

### जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल–ॲड.अजित देशमुख



**बीड दि.२६ (प्रतिनिधी) :– बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे जेष्ठ समाज सेवक मा.अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.**

जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे.

दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. पान २ वर

## दिलगीर आहोत

दैनिक पार्श्वभूमीच्या ऑनलाईन पोर्टलवर दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी 'एस.पी.ऑफीस समोरच उपोषण, बीड ग्रामीण पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली आहे. ऑनलाईन पोर्टलचे वार्ताहर आनंद वीर यांनी वार्तांकन करतांना त्यांना व त्यांच्या सोबत इतर पत्रकारांसमोर व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेमध्ये मयत सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या पत्नीचे आणि फाटे यांच्या

पत्नीचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याचा उल्लेख असल्याचे सांगितले. वास्तविक पाहता या प्रकरणात पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या पत्नीचा उल्लेख चुकीने करण्यात आलेला आहे.

जाधवर यांच्या पत्नीने केलेले आरोपही चुकीचे आहेत. या प्रकरणात पोलीस दलाची प्रतिमा मलीन करण्याचा आणि बदनामी करण्याचा कुठलाही हेतू नाही. काँवत यांच्या पत्नीचे नाव येणे चुकीचे आहे, झालेली ही चूक आम्ही मान्य करत दिलगिरी व्यक्त करत आहोत.

**गंमत भंडारी**
संपादक
दैनिक पार्श्वभूमी, बीड.

# बीडच्या महावितरणमधील सर्व प्रतिनियुक्त्या रद्द

## ▮ आदेश न पाळल्यास होणार कारवाई ▮

बीड दि.२६ (प्रतिनिधी):- महावितरणच्या मंडळात सेवा नियमावली आणि प्रशासकीय आदेशांना डावलून बेकायदेशीररित्या करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या आता रद्द करण्यात आल्या आहेत. अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांनी यासंदर्भात कडक पवित्रा घेतला असून, सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आदेशाची अंमलबजावणी करण्यात कुचराई केल्यास संबंधित उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. बीड मंडळातील विविध विभाग आणि उपविभागांमध्ये अधिकृत भरती प्रक्रिया आणि नियमांना बगल देऊन अनेक कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर प्रतिनियुक्त्या करण्यातआल्याच्या तक्रारी झाल्याने याप्रकरणाची गंभीर दखल घेत अधीक्षक अभियंत्यांनी ही कारवाई सुरू केली आहे. अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांनी कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे कळवले आहे की, आपल्या विभागात अशा प्रकारे कोणाच्या प्रतिनियुक्त्या केल्या असल्यास त्याची माहिती तात्काळ सादर करावी आणि त्या तात्काळ रद्द कराव्यात. या आदेशाची अंमलबजावणी करत कार्यकारी अभियंता (स व सु विभाग, बीड) यांनी आपल्या अखत्यारीतील सर्व उपविभागीय कार्यालयांना (बीड शहर, ग्रामीण, गेवराई, आष्टी, पाटोदा, शिरूर इ.) स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

मुख्यालय सोडणाऱ्यांवर कारवाई होणार असून प्रशासनाने जारी केलेल्या आदेशात मूळ पदस्थापनेऐवजी इतर ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक व अतांत्रिक कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून त्यांच्या मूळ जागी पाठवावे. या पत्राद्वारे विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या सर्व प्रतिनियुक्त्या रद्द करण्यात येत आहेत. या आदेशानंतरही जर कोणी कर्मचारी मूळ पदस्थापनेच्या ठिकाणाऐवजी इतरत्र काम करताना आढळला, तर कँपनीच्या नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल.महावितरणच्या या निर्णयामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून, 'वशिलेबाजी' करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता पुन्हा आपल्या मूळ कर्तव्यावर परतावे लागणार आहे.

# नोटरी ॲड.मारहाण प्रकरणात पोलीस अधीक्षकांना नोटरी प्रदेशाध्यक्ष सिकँदर अली व नोटरींच्या वतीने निवेदन



बीड दि.२६ (प्रतिनिधी):- बीड न्यायालय परिसरात नोटरी ॲड. राम पांडुरंग डोंगरे यांच्यावर झालेल्या गंभीर मारहाण, जीवित धोका निर्माण करणाऱ्या धमक्या व कायदा व्यवसायात अडथळा निर्माण करण्याच्या प्रकरणी आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा नोंद करून कठोर दंडात्मक कारवाई करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांना महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या वतीने प्रदेशाध्यक्ष व ऑल इंडिया नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सय्यद सिकँदर अली यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. राहुलकुमार राका, प्रदेश कार्यकारणी सदस्य नोटरी ॲड. सय्यद अजहर अली, नोटरी ॲड.यासिर पटेल ,जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. रामजी दहिवाळ , महिला जिल्हाध्यक्षा ॲड.विद्या गायकवाड, जिल्हा उपाध्यक्षा ॲड. संगीता वीर, ॲड.छाया वाघमारे, नोटरी ॲड.भाऊसाहेब लटपटे, नोटरी ॲड.शरद कोठावळे, नोटरी ॲड.राजेंद्र बन, ॲड.मुकुंदराज खेत्रे , नोटरी ॲड.सुरेश हंगे, नोटरी ॲड.जाधवर आदींसह बहुसंख्य नोटरी बांधव आवर्जून उपस्थित होते.

# अखेर व्हॉट्सॲप झुकले

## ग्राहकांचा डेटा शेअर करणार नाही

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसेवा):- जागतिक तंत्रज्ञान कँपन्या मेटा आणि व्हॉट्स ॲपने सोमवारी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, त्या कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया(सीसीआय)च्या गोपनीयता आणि जाहिरातींशी संबंधित डेटा शेअर करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि एनसीएलएटीच्या निर्देशांचे पालन करतील.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि विपुल एम पंचोली यांचे खंडपीठ गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये नॅशनल कँपनी लॉ अपीलेट ट्रिब्यूनलच्या निर्देशांविरुद्ध या तंत्रज्ञान कँपन्यांच्या अपीलवर सुनावणी करत होते. सीजेआयच्या कठोरतेनंतर व्हॉट्सॲप आणि मेटाने सीसीआयचे आदेश स्वीकारले. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी आश्वासन दिले की, १६ मार्च २०२६ पर्यंत गोपनीयता धोरणाचे (प्रायव्हसी पॉलिसी) सर्व नियम लागू केले जातील. न्यायालयाने कँपनीची स्थगितीची याचिका फेटाळून लावली आहे. आता वापरकर्त्याला जाहिरात कँपन्यांना डेटा शेअर करण्याचा पर्याय द्यावा लागेल.

मेटा-व्हॉट्सॲपला प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल

कँपन्यांना सीसीआयसमोर एक अनुपालन प्रतिज्ञापत्र देखील दाखल करावे लागेल. दंडाशी संबंधित मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू राहील, परंतु तात्काळ प्रभावाने व्हॉट्सॲपने आपल्या गोपनीयता धोरणात बदल करून वापरकर्त्यांना संमतीचा पर्याय द्यावा लागेल.

सीसीआयने ठोठावला होता २१३ कोटींचा दंड

४ नोव्हेंबर २०२५ रोजी, एनसीएलएटीने सीसीआयचा डेटा शेअरिंगशी संबंधित आदेश रद्द केला होता. या आदेशात इन्स्टंट-मेसेजिंग ॲपला पाच वर्षांसाठी जाहिरातीच्या उद्देशाने मेटा प्लॅटफॉर्म्ससोबत डेटा शेअर करण्यापासून प्रतिबंधित केले होते. परंतु सोशल-मीडिया प्लॅटफॉर्मवर २१३ कोटी रुपयांचा दंड कायम ठेवला होता. नंतर, ट्रिब्युनलने स्पष्ट केले की, गोपनीयता आणि संमती सुरक्षा उपायांवर वॉट्सएप प्रकरणात त्याचा आदेश गैर-वॉट्सएप उद्देशांसाठी वापरकर्ता-डेटा संकलन आणि शेअरिंगला देखील लागू होतो.

# 'एनसीईआरटी'च्या पुस्तकावरून सरन्यायाधीश संतप्त

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसेवा):- एनसीईआरटीच्या इयत्ता आठवीच्या पुस्तकात न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराबाबतच्या असलेल्या मजकुरावर सरन्यायाधीश सूर्य कान्त यांनी तीव्र आक्षेप घेतला असून, मी कोणालाही संस्थेची बदनामी करू देणार नाही, हे प्रकरण कशा पद्धतीने हाताळायचे ते आपल्याला माहिती आहे, हा प्रकार जाणीवपूर्वक करण्यात आला आहे, असे स्पष्ट करीत त्याची गंभीर दखल त्यांनी घेतली.

राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) आठवीच्या समाजशास्त्र पुस्तकात 'न्यायव्यवस्थेमधील भ्रष्टाचार' आणि 'अधिक काळ सुरू असलेले प्रलंबित खटले' या विषयावर धडे आहेत. पुस्तकाच्या संपादित आवृत्तीत हा सर्वात मोठा बदल आहे. त्यात न्यायव्यवस्थेची रचना आणि न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

बुधवारी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी सरन्यायाधीशांकडे एनसीईआरटी मधील धड्याचा मुद्दा उपस्थित केला. सिब्बल म्हणाले की, आठवीच्या विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्था भ्रष्ट असल्याचे शिकविले जात आहे. हे मनाला अत्यंत अस्वस्थ करणारे आहे. सरन्यायाधीशांनी सांगितले की, त्यांना या प्रकरणाची जाणीव आहे. मी कोणालाही संस्थेची बदनामी करू देणार नाही. मला ते कसे हाताळायचे हे माहित आहे, असे सूर्य कान्त म्हणाले.

# बारामतीमध्ये रोहित पवारांची पोलिसांसोबत शाब्दिक चकमक

बारामती दि.२६ :- दिवंगत नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती विमान अपघातमध्ये निधन झाले. अजित पवारांच्या निधनाला एक महिना होत आला असून हा अपघात आहे की घातपात यावरुन वाद निर्माण झाला आहे. अजित पवारांच्या निधनावर आमदार रोहित पवार यांनी संशय घेतला आहे. तसेच त्यांनी विमान कँपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मात्र पोलिसांनी फक्त एफआयआर दाखल केला असून गुन्हा दाखल केलेला नाही. यावरुन रोहित पवारांचा मुंबई पोलिसांसोबत वाद झाल्यानंतर आता बारामतीमध्ये देखील रोहित पवारांची पोलिसांसोबत शाब्दिक चममक झाली आहे.

पान १ वरून

### जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्येही आता स्वीकृत सदस्य

जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

### पाणी पुरवठ्याच्या नियोजना विषयी अनुभवी नगर सेवकांनी

उकरल्यास तो पाईप गंजलेला आणि सडलेला दिसतो. यामधून मुख्य पाईप लाईनमध्ये घाण पाणी जाते. पाणी पुरवठा समतोल राखण्यासाठी टाकीमध्ये भरपूर पाणी आवश्यक असते जेणेकरुन सर्व विभागास सर्व नळांना फुल दाबाने पाणी पुरवठा होऊ शकतो. टाकीवरील कर्मचारी अनुभवी असणे आवश्यक आहे. वेळोवेळी ब्लिचींग पावडर टाकणे, तुरटी डोस, फिल्टर इत्यादी कामे व्यवस्थीत पार पडू शकतात. या सर्व बाबी जुन्या आणि अनुभवी नगर सेवकांनी सभागृहात मांडणे आवश्यक आहे.

### वाल्मिक कराडचा जामिन फेटाळला...

पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात वाल्मिक कराड हाच या हत्येचा सुत्रधार असल्याचा उल्लेख आहे. अवादा कंपनीकडून खंडणी मागितल्याच्या वादातून संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. खंडणी, ॲट्रॉसिटी आणि हत्या या तिन्ही गुन्ह्यांचा एकत्रित उल्लेख आरोपपत्रात करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता अधिकच वाढली आहे. सर्वोच्च न्यायालयाने जामिन फेटाळल्याने वाल्मिक कराडच्या अडचणी वाढल्या आहेत.

### माझ्या विरोधात स्टींग ऑपरेशनचा कट

येत्या चार ते पाच दिवसांमध्ये फार मोठा कट हा मुंबई येथे रचला जातोय, त्यात एका महिलेचा देखील समावेश आहे. तेथे तर स्टिंग ऑपरेशन सुरू आहे. मात्र आपणही काही कमी नाही, आपली देखील यंत्रणा कामाला लागली आहे. कट का रचला जातोय ? तर मी फक्त गरिबांच्या लेकरांसाठी काम करतोय म्हणून. मात्र आपल्याला काही फरक पडत नसल्याचे सांगत मनोज जरांगे यांनीही इशारा दिला आहे. हिंगोलीच्या कामठा फाटा येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

### बार्शी नाका चौक तोडून टाकला...

आवश्यक होते, परंतु संबंधीत विभागाने अशी कोणतीच प्रक्रिया पूर्ण केली नाही, त्यामुळे नगर पालिकेने तात्काळ संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे.

### बीडमधील बोगस गुंठेवारी, लेआऊटची जिल्हाधिकारी करणार चौकशी

(आरक्षण क्रमांक १०७), १७ (आरक्षण क्रमांक १०८) तरफ देशमुख, सर्व्हे नंबर ३१,३२ तरफ खोड, सर्व्हे नंबर १५१,१५२ तरफ बोबडे या भूखंडावर आरक्षण असतांना सुद्धा नगर परिषद प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने ले-आऊट करत शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसुल बुडवून भ्रष्टाचार केला अशी लक्षवेधी १५ जुलै २०२५ रोजी पावसाळी अधिवेशनात मांडली होती. या प्रकरणात त्वरीत कारवाई करावी असेही त्यांनी लक्षवेधीत नमूद केले होते. सदरील लक्षवेधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्यामध्ये सहाय्यक संचालक नगर रचना बीड, जिल्हा प्रशासन अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. या समितीने तात्काळ स्थळ पाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### 'ई-२०' इथेनॉलची विक्री बंधनकारक

आणि कृषी अधिशेषाला मागणी वाढून शेतकऱ्यांनाही लाभ होतो.

उद्योग अधिकाऱ्यांच्या मते, २०२३-२०२५ दरम्यान व त्यानंतर भारतात तयार झालेली बहुतांश वाहने ई-२० वर चालण्यासाठी डिझाइन केलेली असल्याने मोठ्या अडचणी अपेक्षित नाहीत.

तथापि, जुन्या वाहनांच्या मायलेजमध्ये ३ ते ७ टक्क्यांपर्यंत थोडी घट होऊ शकते. तसेच रबर/प्लास्टिक घटकांची झीज होण्याची शक्यता आहे. किमान आरओएन ९५ ची अट इंजिनचे नुकसान टाळण्यासाठी घालण्यात आली आहे. आरओएन (रिसर्च ऑक्टेन नंबर) म्हणजे इंजिन नॉकिंग (पूर्व-प्रज्वलन) रोखण्याची इंधनाची क्षमता मोजणारा निर्देशांक. नॉकिंगमुळे इंजिनमध्ये इंधन असमान जळते, खटखट आवाज येतो, शक्ती कमी होते आणि कालांतराने इंजिनचे नुकसान होऊ शकते.

आरओएन जितका जास्त, तितकी नॉकिंगला प्रतिकारक्षमता अधिक असते. सोप्या शब्दांत, ऑक्टेन म्हणजे दाबाखाली इंधनाचे स्वसंयम. जास्त आरओएन म्हणजे इंधन अधिक स्थिर राहते.

इथेनॉलचा ऑक्टेन मूल्य नैसर्गिकरित्या जास्त (सुमारे १०८ आरओएन) असतो. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळल्याने नॉकिंगविरोधी क्षमता वाढते. जून २०२२ मध्ये पेट्रोलमध्ये १० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य ठरलेल्या वेळेपेक्षा पाच महिने आधी साध्य झाल्यानंतर सरकारने २० टक्के मिश्रणाचे उद्दिष्ट २०३० ऐवजी २०२५-२६ पर्यंत पुढे आणले. सध्या देशातील बहुतांश पंपांवर ई-२० किंवा २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल उपलब्ध आहे.

परकीय चलनात १.४० लाख कोटींची बचत

तेल मंत्रालयानुसार, २०१४-१५ पासून पेट्रोलच्या पर्यायामुळे भारताने परकीय चलनात १.४० लाख कोटी रुपयांहून अधिक बचत केली आहे.

### पोलीस पाटील भरतीतील गैरप्रकारामुळे...

त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे. तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात तक्रार देखील झालेली आहे. अशा अनेक गंभीर बाबी समोर आलीने स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले, तरच पात्र उमेदवारांची या पदावर निवड होणे शक्य होईल. अन्यथा प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांनी भरोसा दाखवला, तर ते चुकीचे ठरेल.

दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे माहिती कळविण्यात आली. त्यांनी या सर्व प्रकारची सत्यता पडताळून पाहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यापुढे या नोकर भरती मध्ये गैरप्रकार होऊ नयेत, अशी अपेक्षा आहे.

बीड जिल्हा भ्रष्ट कारभाराने नेहमीच गाजत असतो. त्यामुळे पोलीस पाटील पदाच्या होणाऱ्या या मोठ्या भरती मध्ये पात्र उमेदवारच निवडले गेले पाहिजेत. भ्रष्ट मार्गाने यात निवड होऊ नये, यासाठी प्रशासनाबरोबरच जनतेने देखील दक्ष राहणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### मतदान अनिवार्य करणे गरजेचे

ग्रामीण विरुद्ध शहरी

न्यायालयाने आपल्या टिप्पणीत एक महत्त्वाचा फरकही अधोरेखित केला. ग्रामीण भागात मतदानाचा दिवस हा एखाद्या सणासारखा उत्साहात साजरा केला जातो. याउलट, सुशिक्षित आणि शहरात राहणारे लोक मतदानासाठी बाहेर पडण्यास टाळाटाळ करतात. हा विरोधाभास दूर करण्यासाठी मतदानाला एका यंत्रणेखाली आणणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने सुचवले.

'नोटा' ठरतोय निष्प्रभ

न्यायालयाने म्हटले की, दहा वर्षांपूर्वी 'नोटा'चा पर्याय चांगल्या उमेदवारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणला होता. मात्र, प्रत्यक्षात खूपच कमी लोकांनी याचा वापर केला आहे. ज्या मतदारसंघात केवळ एकच उमेदवार निवडणूक लढवत असेल, तेथेही 'नोटा'चा पर्याय असावा, जेणेकरून त्या उमेदवाराला लोकांचा खरा पाठिंबा आहे का, हे कळू शकेल. न्यायालयाने स्पष्ट केले की, 'नोटा'ला उमेदवाराचा दर्जा द्यायचा असेल, तर 'जनप्रतिनिधीत्व कायद्यात' दुरुस्ती करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे.

कोणाचा विरोध ?

केंद्र सरकारने या याचिकेचा विरोध करताना प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सरकारनुसार, 'नोटा' हा केवळ एक पर्याय आहे, तो कोणताही व्यक्ती किंवा कायदेशीर उमेदवार नाही. त्यामुळे त्याला उमेदवाराचा दर्जा देता येणार नाही. ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी युक्तिवाद केला की, मतदान करणे हा काही मूलभूत अधिकार नाही. तसेच, कायद्यात काय सुधारणा करायच्या, हे न्यायपालिकेने नव्हे तर संसदेने ठरवायचे आहे.

पान ६ वरून

### द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात स्वा.सावरकर पुण्यतिथी साजरी

वाघमारे सर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची ने मजसी ने परत मातृभूमीला ही सुंदर अशी कविता सादर केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी एस.के.यांनी ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करून काळ्यापाण्याची शिक्षा दिली. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही. तुरुंगात असताना त्यांनी भिंतीवर कविता लिहिल्या आणि देश प्रेमाची भावना जिवंत ठेवली असे अनमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.मुंदडा डी.बी.यांनी केले.

### पोलीस पाटील भरतीच्या आजपासून मुलाखती

संपूर्ण प्रक्रिया समितीमार्फत पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून कोणत्याही अफवा अथवा गैरसमजांना बळी पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### २ कोटींच्या कथित अपहार प्रकरणी चौकशीचे आदेश

आला आहे. त्यामुळे प्रशासनावर तातडीने आणि निष्पक्ष कारवाई करण्याचा दबाव वाढला आहे. चौकशीदरम्यान ग्रामपंचायतीची सर्व आर्थिक कागदपत्रे, बँक व्यवहार, मंजुरी प्रक्रिया आणि खर्चाच्या नोंदींची बारकाईने तपासणी केली जाणार असल्याची माहिती आहे. चौकशी अहवालानंतर दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि प्रामाणिकपणा ही मूलभूत अपेक्षा असते. शासनाकडून विकासकामांसाठी दिलेला निधी हा जनतेच्या विश्वासाचा आणि हक्काचा असतो. त्या निधीचा अपहार हा केवळ आर्थिक गुन्हा नसून जनतेच्या विश्वासघातासमान आहे. दरम्यान, संबंधित सरपंच किंवा ग्रामपंचायत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. चौकशी पूर्ण झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार असली, तरी गावकऱ्यांनी या प्रकरणात कोणतीही दडपशाही न होता निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी केली आहे.

गावाच्या विकासासाठी असलेला प्रत्येक रुपया हा जनतेचा आहे – आणि त्या पैशांचा हिशेब देणे ही संबंधितांची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. दोषींना पाठीशी घालण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा कडक इशारा स्थानिक स्तरावरून देण्यात येत आहे.

### भीलखोरी तांडा येथील जलजीवन मिशन योजनेचे काम तात्काळ सुरु

येतील ग्रामस्थानी आज गेवराई माजलगाव हायवे येथील सिरसदेवी फाटा येथे रास्ता रोको करून मागणी केली आहे.ग्रामस्थानी गावांतर्गत येणाऱ्या भीलखोरी तांडा, हनुमान वस्ती, यादव वस्ती या ठिकाणी नवीन पाईपलाईन नळ कनेक्शन देण्यात यावे तसेच पाण्याची टाकीचे काम अपूर्ण असून तात्काळ काम चालू करावे तसेंच स्विच रूम, खोदकाम ३ इंच पाईपलाईन भीलखोरी तांडा ते पांडुळ्यांचीवाडी पर्यंत करणे अश्या अनेक मागण्या ग्रामस्थानी रास्ता रोको आंदोलन करून केल्या आहेत येणाऱ्या आठ दिवसात काम न चालू केल्यास बीड जिल्हा अधिकारी यांच्या दालनासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा भीलखोरी तांडा येथील माजी ग्रामपंचायत सदस्य तथा भाजपा गेवराई तालुका उपाध्यक्ष दिनकर राठोड यांनी दिला आहे.या रास्ता रोको आंदोलन दरम्यान तलवाडा पोलीस स्टेशनचे उप निरीक्षक स्वप्नील कोळी यांनी आंदोलन करत्याचे निवेदन स्वीकारून यावेळी रास्ता रोको आंदोलन संपवण्यात आले.यावेळी उपस्थित सिरसदेवी,भेलखोरी तांडा येथील नागरिक, युवक मोट्या संख्येने उपस्थित होते.

### वाघोऱ्याच्या सरपंच,ग्रामसेवक, बिडीओच्या नावाखाली आर्थिक लुट

नाही तर मस्टर झिरो करतात, फळबाग लागवडीचे मस्टर काढण्यासाठी पैसे घेतलेले असुन विवीध योजनेचे मस्टर काढण्यासाठी पैसे घेत असल्याचा व्हिडिओ देखिल व्हायरल झाला आहे. त्यामुळे या ग्रामरोजगार सेवकाच्या जाचाला वाघोरा ग्रामस्थ कंटाळले असुन त्याचेवर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थ कोंडीबा लिंबाजी लोंढे यांचेसह वाघोरा ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे.

### पाटोदा-आष्टीत २००२ उमेदवारांपैकी

सहभाग नोंदविला होता. निकाल जाहीर झाल्यानंतर यापैकी ८१९ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत.

मुलाखतींसाठी उपविभागीय कार्यालयासमोर मंडप उभारणीचे काम सुरू असून उमेदवारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, कागदपत्र पडताळणी कक्ष तसेच मुलाखत कक्षाची सुयोग्य आखणी करण्यात येत आहे. दररोज १०० उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून प्रत्येक उमेदवाराला पाच मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे. कागदपत्र पडताळणी व तोंडी मुलाखत अशा दोन टप्प्यांत ही प्रक्रिया पार पडणार आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.मुलाखत समितीच्या अध्यक्षपदी उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख स्वतः असणार आहेत. समितीत संबंधित विभागाचे डीवायएसपी, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, समाज कल्याण विभागाचा प्रतिनिधी तसेच आदिवासी प्रकल्प विभागाचा प्रतिनिधी यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया सर्वसमावेशक आणि संतुलित पद्धतीने पार पडणार आहे. दरम्यान, उमेदवारांना मुलाखतीसंदर्भातील सर्व माहिती पोलीस पाटील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### वनमंत्री नाईक यांनी सभागृहाची दिशाभुल केली

सय्यद सादेख अली रामधन जमाले, अभिमान खरसाडे आदीसह विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिक सहभागी होते.तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित पवार यांच्या उपस्थितीत व जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ७ आगस्ट २०२५ रोजी एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड केल्याचा दावा करण्यात आला होता. या मोहिमेसाठी जिल्हा प्रशासनाने तब्बल ४२ कोटी रुपयांचा खर्च केल्याचे सांगितले गेले.मात्र प्रत्यक्षात १० टक्केही झाडे जिवंत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या संदर्भात सखोल चौकशीची मागणी करत विविध आंदोलने करण्यात आली; परंतु प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे. दरम्यान दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी विधानसभेत आ. चेतन तुपे यांनी प्रश्न उपस्थित केला असता, त्यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी एका दिवसात ३० लाख नव्हे तर ६३ लाख वृक्षलागवड झाल्याचे आणि त्यापैकी ९६ टक्के झाडे जिवंत असल्याचे सांगितले. या विधानामुळे जिल्हा प्रशासनाकडून शासन व सभागृहाची दिशाभूल झाल्याचा आरोप करत आंदोलन छेडण्यात आले असे सांगून या आंदोलनातून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### आरटीआय प्रवेशातील अंतराची जाचक अट रद्द करा

शाळा जसे की, गुरुकुल शाळा, पोद्दार, ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, भगवान इंग्लिश स्कूल, मोईल स्कूल , अशा व अनेक नामवंतीक शाळा शहराच्या एका टोकाला किंवा मुख्य वस्तीपासून दूर अंतरावर स्थित आहेत. बीड शहरासह जिल्ह्यात गेवराई, अंबाजोगाई,केज, धारूर, वडवणी,परळी, माजलगाव, पाटोदा, आष्टी , शिरूर या तालुक्यात हिच परिस्थिती आहे की एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचे शाळांचे अंतर साधारणपणे ५ ते ६ किलोमीटर आहे. अशा परिस्थितीत केवळ १ किमी अंतराची अट सक्तीची केल्यामुळे, शहराच्या मध्यवर्ती किंवा जुन्या शहरात राहणाऱ्या पालकांना आरटीई पोर्टलवर या प्रमुख शाळांचे पर्याय निवडणे अशक्य झाले आहे.हि बाब जे.डी.शाह यांनी आपल्या पत्रात पुढे नमूद केले की, 'शिक्षण हक्क कायदा २००९' चा मूळ उद्देश समाजातील वंचित घटकांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी देणे हा आहे. मात्र, ५ ते ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या शाळांसाठी १ किलोमीटरची अट लावणे तांत्रिकदृष्ट्या चुकीचे असून, यामुळे राज्यातील हजारो पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत आहेत. खासगी शाळांचे भरमसाठ शुल्क भरणे गरीब पालकांना परवडणारे नसल्याने, शासनाने ही अट तातडीने रद्द करावी. तसेच पूर्वीप्रमाणेच ० ते १ किमी, १ ते ३ किमी आणि ३ ते ८ किमी पर्यंतची अंतराची लवचिक मर्यादा पुन्हा लागू करण्याबाबत सुधारित आदेश निर्गमित करावेत, अशी आग्रही विनंती वजा मागणी मुख्यमंत्री .शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे समाजसेवक जे.डी.शाह यांनी केली आहे.

### उच्च न्यायालयात याचिका

नागरीक शेख वसिम, सतिश क्षीरसागर यांनी बीड शहरातील नागरीकांची होणारी गैरसोय पाहता थेट उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका दाखल केली असून याचिकेत क्रीडांगण हे व्यायामा व्यतिरिक्त इतर कुठल्याही मनोरंजनाच्या कार्यक्रमाला देण्यात येवू नये अशी मागणी याचिकेत केलेली आहे. क्रीडांगण, बगीचे यांचा वापर नागरीकांसाठी सशक्त पर्यावरण, स्वच्छ हवा, निरोगी राहण्यासाठी व्हावा असे याचिकाकर्त्यांची मागणी आहे. सदरील याचिकेत महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांना प्रतिवादी केले असून याचिकाकर्त्यांच्या वतीने ड.महेंद्र पंडीतराव गंडले हे बाजू मांडत आहेत.

### वकीलाला मारहाण प्रकरण

थेट गृहमंत्री यांनी या प्रकरणी लक्ष घातल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने आरोपी करपे याला अटक केली. त्याला गुरुवारी न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणातील अन्य चार ते पाच आरोपी अद्यापही फरार आहेत.

### विज्ञानाला धर्म मानणारे सावरकर होते- डॉ.बाहेगव्हाणकर

विज्ञान हाच धर्म माना असे आवाहन त्यांनी केले. यंत्र युगाचा पुरस्कार केला. विज्ञानाचा मंत्र म्हणत क्रांतीची मशाल हाती घेऊन मदनलाल धिंग्रा, अनंत कान्हेरे यासारख्या असंख्य क्रांतिकारकांना प्रेरणा देऊन स्वातंत्र्यलढ्यात उतरवले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आचरणात आणावेत असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. संकुलाचे कार्यवाह अविनाश देशपांडे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ पान -३


## एनएमएमएस परीक्षेत भगवान विद्यालयाचे ६० विद्यार्थी उत्तीर्ण

बीड दि २६ (प्रतिनिधी) -महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी एनएमएमएस परीक्षा २०२५-२०२६ चा निकाल नुकताच जाहीर केला. या परीक्षेसाठी शहरातील भगवान विद्यालयातून १६५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ११ मुलांना १०० पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. या परीक्षेतील गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक १२ हजार रु स्कॉलरशिप मिळते.या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था कार्यकारी अध्यक्ष गो.गो. मिसाळ सर, संस्था अध्यक्ष झेड एन सानप सर, उपाध्यक्ष प्रकाशराव सुस्कर, सचिव डॉ अनिलकुमार सानप सर, कोषाध्यक्षा डॉ.सौ. वृषालीताई सानप मॅडम, सहसचिव विष्णुपंत जायभाये, ज्येष्ठ संचालक अण्णासाहेब जायभाये, संचालक सत्यसेन मिसाळ सर, शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर, उपमुख्याध्यापक गर्जे सर, पर्यवेक्षक ढोकर सर, मार्गदर्शक वारे सर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले.

## मंत्री अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त केले नायगाव मयूर येथे विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप

पाटोदा दि २६ (प्रतिनिधी) -राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली असताना राज्याचे मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा वाढदिवस सामाजिक कार्यातून साजरा केला जात असताना तालुक्यातील नायगाव मयूर येथील नाथनिवासी आश्रम शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले .मंत्री सावे यांचा वाढदिवस २६ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला .

## पाडळसिंगी टोल नाका महामार्ग

# पोलिसांनी सुसाट कार थांबवताच पळवा पळवीचे प्रकरण उघडकिस

### तिकडे गुन्हा दाखल होतानाच इकडे संशयित आरोपी ताब्यात

बीड दि २६(प्रतिनिधी)- पोलिसांनी मनावर घेऊन काम केलं तर होणाऱ्या घटना टळतात, शिवाय घटना करून जाणारे देखील हाती लागल्याशिवाय राहत नाहीत. अलीकडे मूलींना फूस लावून पळवण्याचे प्रकार सतत घडत आहेत. गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी टोल नाक्यावर कार्यरत असलेल्या महामार्ग पोलिसांनी संशयावरून गाडी थांबवून केलेल्या चौकशीत अशीच घटना समोर आली. उदगीर तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीला पळवून नेत असल्याचं प्रकरण समोर आलं. एका अल्पवयीन मुलीला पळून नेत असताना महामार्ग पोलिसांनी गाडी पकडल्याने पाडळशिंगी महामार्ग पोलिसांच्या कर्तव्य तत्परतेचे कौतुक केले आहे.यासंदर्भात समोर आलेली माहिती असली की, गेवराई तालुक्यातील एन एच ५२ धुळे सोलापूर महामार्गावर असलेल्या पाडळसिंगी टोल नाका येथे पाडळसिगी महामार्ग पोलिसांच्या पथकाच्या सपोनि माधुरी मुंडे ह्या २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे आपले कर्मचारी पोलीस हवालदार काकडे, जमशेट्टे , पोलीस शिपाई इंगोले, गोंडे त्यांना बरोबर घेऊन नेहमीप्रमाणे मोटार वाहन कायद्याच्या अनुषंगाने वाहनांची तपासणी करून कारवाया करीत असताना जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारक व प्रवाशांना दिसून येत होते. यातच पोलिसांच्या हालचालीकडे तेथे उपस्थित असलेले लोकांचे लक्ष गेले. सायंकाळी ५ नंतर बीड कडून गेवराई कडे सूसाट वेगात एम ०१,बीबी ८९५७ या क्रमांकाची टोयोटा इटियोस कार येत असल्याने महामार्ग पोलीस पथकाला संशय आला. त्यांनी सदर कार थांबवून गाडी मधील तरुणांचे नाव गाव विचारून चौकशी चालवली. तसे सखोल केलेल्या चौकशीमध्ये महामार्ग पोलीस पथकाने गाडी मधील तीन तरुण व एक मुलीला ताब्यात घेतल्यान या प्रकाराकडे सर्वांच्याच नजरा लागल्या.सदर गाडीत असणारी १९ ते २० वर्षाचे तरुण मुले व एक मुलगी दिसून आल्याने पाहणाऱ्यांचे याकडे नजर ठेवून होते. महामार्ग पोलीस च्या सपोनि माधुरी मुंडे व त्यांचे कर्मचारी यांनी चालवलेल्या चौकशीत या मुलांनी त्यांचे नाव गाव व पत्ते देखील सांगितले. तसे पोलीस पथक सतत फोन लावून चौकशी करीत असताना दिसून येत होते. याचं वेळी त्यांच्या मदतीला गेवराई पोलीस धावून आल्याचे देखील पाहणाऱ्यांच्या नजरेतून सुटलं नाही . यानंतर महामार्ग पोलिसांनी थांबवलेली कार व त्यामधील मधील ३ तरुणासह सदर मुलीला पुढील कारवाईसाठी गेवराई पोलीस घेऊन गेले असल्याचे दिसून आले .सदर ताब्यात घेतलेली ३ तरुण सदर अल्पवयीन पिडित मुलीला पळवून नेत असल्याचा बोललं जाऊ लागले. केव्हा आहे तरुण सदर पिढीतेला का नेत होते? याची माहिती मिळाली नाही. मात्र अलीकडे मुलींना फूस लावून पळून नेण्याचे प्रकार सतत घडत आहेत. यातच हे प्रकरण समोर आल्याने पाडळसिंगी टोल नाका महामार्ग पोलिसांनी भरधाव वेगात येत असलेल्या कारवर संशय घेऊन केलेल्या चौकशीत हे प्रकरण समोर आल्याने नेमकी घटना काय?

यासंदर्भात पाठपुरावा करत या प्रकाराचा कानोसा घेतल्यानंतर महामार्ग पोलिसांनी जी कारवाई केली ते प्रकरण किती गंभीर होते? व महामार्ग पोलीस सतत मोबाईलवर कुणाला बोलत होते? हे लपून राहिलं नाही. महामार्ग पोलीसानी या तिन्ही मुलांची चौकशी चालवल्यानंतर मिळालेल्या माहितीवरून ते लातूर जिल्ह्यातील देवणी पोलीस ठाण्याशी संपर्क साधत होते असे समोर आले. मुलीला पळवून नेल्या सदर्भात सदर अल्पवयीन पिडितेचे पालक देवणी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी बसले होते. याच वेळी महामार्ग पोलिसांनी गाडीसह हे तरुण ताब्यात घेतले. नंतर देवणी पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल झाल्याचेही समजते.

याकडे मात्र सर्वांचे लक्ष लागले तसे सदर घटना अनेकांच्या कानी पडली. चौकशीसाठी ताब्यात घेतलेले तरुण हे उदगीर येथील कित्या गल्ली येथील शेख कलीम शेख हक्कांनी वय १९ वर्षे, मुसा नगर उदगीर येथील बिलाल खलील कुरेशी वय २५ वर्ष व अश्फाक करीम शेख वय २० वर्ष अशी त्यांची नावे असल्याचे समजते. तर अल्पवयीन पिडित मुली संदर्भात माहिती मिळू शकली नाही.तर सदर प्रकरण जसे समोर आले तसे पाडळसिंगी टोल नाका महामार्ग पोलीस यांच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक होऊ लागले आहे.

## पायी नर्मदा परिक्रमा करून.भ.प.गजानन शिर्के गुरव यांचा उद्या टाकळी आमीया येथे सत्कार



आष्टी दि २६ (प्रतिनिधी) - हभप गजानन गंगाराम शिर्के पुजारी यांनी पायी नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केली. त्यानिमित्त आष्टी तालुक्यातील टाकळी आमीया येथे भव्य सत्कार, हरिकीर्तन व महाप्रसाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.नर्मदा परिक्रमा पूर्ण झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कन्याभोजन, हरिकीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत बाळूमामा मंदिर ते हनुमान मंदिर टाकळी आमीया या मार्गावर भजन मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत हरिपाठ तर सायंकाळी ७ ते ८.३० वेळेत दादा महाराज चांगुने यांचे हरी किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका गौरव समाज संघाच्यावतीने गजानन शिर्के यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गुरव समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी तालुका गुरव समाज संघाचे अध्यक्ष भीमराव गुरव, उपाध्यक्ष बापूराव क्षीरसागर आणि सचिव राम शिर्के यांनी केले आहे.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालय येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

केज दि २६ (प्रतिनिधी)-तालुक्यातील आनंदगाव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालय येथे वाचन कक्षात प्रिस्टाईन आयुर इंडिया चॅरिटी फाउंडेशन, व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जर्मन टेक्नॉलॉजी मशिनच्या साहाय्याने मोफत आरोग्य तपासनी शिबीर व तज्ञांचे मागदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

डॉ. प्रविण बढे यांच्या मार्गदर्शना खाली व डॉ. राजेंद्र बळे, डॉ. राहुल शिंदे परमेश्वर भवर, मधुकर भाकरेमामा, सचिन शिंदे यांनी मोफत आरोग्य तपासनी करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजक प्राचार्य, डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जर्मन टेक्नॉलॉजी मशीनच्या साहाय्याने मोफत आरोग्य तपासनी शिबीर घेण्यात आले. ५० लोकांची तपासनी करण्यात आली दरम्यान सुरुवातीस तज्ञ टिमचे स्वागत माजी सरपंच रामराजे गायकवाड, माजी सरपंच ज्ञानोबा भोगजकर, गणपत गायकवाड, मच्छिंद्र पुरी, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, आनंद भैय्या गायकवाड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून करण्यात आले. शेवटी अध्यक्षीय समारोप व आभारही डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी मानले.

## संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त लोकमान्य शाळेत वह्यांचे वाटप होणार

जामखेड दि २६(प्रतिनिधी)-सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त प्रा. धनंजय महादेव भोसले यांच्या आयोजनातून लोकमान्य शाळा, जामखेड येथे शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता लक्ष्मीकांत देशमुख ( शिक्षण विस्तार अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांना वयाचे वाटप करण्यात येणार आहे



यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन नगरसेवक दिगंबर चव्हाण , भाजपाचे शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, दत्त बाल रुग्णालयाचे डॉ. विकास शिंदे, भा. जैन संघटना अध्यक्ष अमोल तातेड, पत्रकार अविनाश बोधले, युवा नेते दिनेश राळेभात हे उपस्थित राहणार आहेत.वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. तरी नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नॅशनल चॅम्पियनशिप रोल बॉल स्पर्धेत कु.स्वरा सानपने मिळवला तिसरा क्रमांक

बीड दि २६ ( प्रतिनिधी) - तामिळनाडू येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये या स्पर्धे मध्ये तिसरा क्रमांक पटकावून महाराष्ट्र टीम कु. स्वरा सचिन सानप यांनी यशाचे शिखर गाठले आहे, याबद्दल टीमचे आणि तिचे क्रीडा शौकीनासह पालक वर्गातून अभिनंदन होत आहे .या नेत्रदीपक कामगिरीबद्दल व कठोर मेहनतीबद्दल माहिती होतास कुमारी स्वरा सचिन सानप हिच्या संदर्भात अनेकांनी अभिमानास्पद गौरव उद्गार काढले .



## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शरद थोरात यांचा वाढदिवस साजरा

केज दि २६ (प्रतिनिधी) आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख शरद सूर्यकांत थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त केज येथील केदारनाथ मल्टिसर्व्हिसेस येथे सत्कार त्यांचा उत्साही वातावरणात सत्कार करण्यात आला.

केदारनाथ मल्टी सर्विस च्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात यावेळी शरद थोरात यांना मान्यवरां च्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शेतकरी कामगार पक्ष राज्य सरचिटणीस भाई मोहन गुंड यांनी आपल्या मनोगतात थोरात यांच्या कार्याचा गौरव करताना, युवकांना संघटित करून सामाजिक प्रश्नांवर आवाज उठविण्याची त्यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे सांगितले.यावेळी पत्रकार विजय बिक्कड, नंदुलाल मिसाळ, पांडुरंग कसबे, लिंबराज गायकवाड, सचिन साखरे तसेच कृष्णा केदार, विश्वास राऊत, हिरामण काळे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी थोरात यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक



वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांच्या मागण्या सरकार कधी मान्य करणार ?

बीड दि २६(प्रतिनिधी)- जिल्ह्यात झालेला एकदिवसीय संप हा केवळ एका दिवसाचे आंदोलन नव्हते, तर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांचा तीव्र आवाज होता. शासकीय कार्यालये बंद राहिली, शैक्षणिक कामकाजावर परिणाम झाला; पण मुख्य प्रश्न आजही तसाच उभा आहे. तेव्हा सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांच्या मागण्या हे सरकार कधी मान्य करणार असा सवाल सय्यद फारुख अहमद खादरी यांनी केला आहे

यासंदर्भात प्रसिद्धी पत्रकात नमूद केले की, सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांचे म्हणणे आहे की त्यांच्या रास्त मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे, सेवा निश्चितीतील त्रुटी दूर करणे, पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि थकबाकीची रक्कम अदा करणे हे सर्व मुद्दे अजूनही निकाली निघालेले नाहीत. विशेषतः कोरोना काळातील १८ महिन्यांचा महागाई भत्ता (डीए) अद्याप देण्यात आलेला नाही. सरकारने देण्याचे आश्वासन दिले, परंतु प्रत्यक्षात ती रक्कम कर्मचाऱ्यांच्या हाती आलेली नाही. दुसरीकडे लोकप्रतिनिधींच्या भत्त्यांवर, सोयी-सुविधांवर, प्रवास आणि सुरक्षेवर कोट्यवधी रुपये खर्च होतात. विविध कार्यक्रम आणि प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. पण शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मात्र निधीअभावाचे कारण पुढे केले जाते हे कितपत न्याय्य आहे?. शिक्षक हा राष्ट्राचा शिल्पकार आहे.तो नव्या पिढीला घडवतो, संविधानाचा आदर शिकवतो, एकता आणि बंधुभावाचा संदेश देतो.मग अशा घटकाला दुय्यम स्थान का? असा सवाल करून बीडमधील हा संप म्हणजे इशारा आहे ही केवळ सुरुवात आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सरकारने कर्मचाऱ्यांना ओझे नव्हे तर भांडवल मानले पाहिजे.८ महिन्यांचा थकीत डीए तातडीने द्यावा, पेन्शन व सेवा विषयक प्रश्न सोडवावेत आणि शिक्षकांना योग्य सन्मान द्यावा.असेही प्रसिद्धी पत्रकात सय्यद फारुख अहमद खादरी यांनी नमूद केले.

## पत्रकार उत्तम ओव्हाळ यांचा अनेकाकडून वाढदिवस साजरा

बीड दि २६ (प्रतिनिधी)- शहरातील बार्शी नाका परिसरात राहणारे उत्तम ओव्हाळ यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी, मित्रपरिवार, नातेवाईक यांनी उत्साही वातावरणात त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले

उत्तम ओव्हाळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नगरसेवक भारत कांबळे मित्र मंडळ पेठ बीड, माजी सभापती अमोल पौळ, गणेश माने, गोरख काळे, बाळू यादव, संतोष ढाकणे, बाजीराव ढाकणे, बबलू



शिंदे, रजनीकांत वीर, दिनकर जाधव, संतोष जोगदंड, लखन जोगदंड, राजाभाऊ मोहाले, सचिन आंधळे, खंडू ढोले, सयाजीराव जाधव, वैभव सरवदे, गौतम ओव्हाळ, रितेश ओव्हाळ, रमेश शिंदे, सुरेश पवार, नितीन चव्हाण, ऋषिकेश रोकडे, रोहन वीर, बाळू वीर, सुधीर धन्वे, काकासाहेब धवन, रुद्रा शिनगारे, अक्षय धन्वे, प्रतीक धन्वे सह आदींनी शुभेच्छा देऊन सत्कार केला.

## स्वप्निल वरपे व मित्र कंपनीने केली श्री कानिफनाथ मंदिर परिसराची स्वच्छता



बीड दि २६ (प्रतिनिधी )- श्री कानिफनाथ यात्रा महोत्सव निम्मित स्वप्निल वरपे पाटील व त्यांच्या युवक मित्रांनी कोरडेवाडी गावातील श्री कानिफनाथ मंदिर परिसरातील प्लास्टिक, खराब वस्तू, कचरा व इतर घाण उचलून साफसफाई केली.

संपूर्ण मंदिर परिसर स्वच्छ करून स्वपनील वरपे व गावातील युवकांनी सामाजिक बांधिलकी जपली असून गावात या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्वप्निल वर्पे यांनी संत गाडगेबाबा यांचे विचार पुढे ठेवून मंदिर परिसराच साफसफाई करण्याचे आपल्या युवक मित्रमंडळीला आवाहन केले होते. त्या आवाहनास मित्रांनी प्रतिसाद दिला मंदिर परिसरात असलेला केरकचरा, दगड गोटे, प्लॅस्टिकच्या पिशव्या बाटल्या उचलल्या गेल्या तसेच सर्वांनी मिळून परिसराचे साफसफाई केली यात्रा महोत्सवानिमित्त तरुणांनी पुढाकार घेतल्याने स्वप्नील वरपे यांच्या पुढाकारातून कामाचं कौतुक होत आहे.

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत शारदा विद्या मंदिरचे ३६ विद्यार्थी उत्तीर्ण

गेवराई दि २६ (प्रतिनिधी)-- राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शारदा विद्या मंदिर गेवराईचे एकूण ३६ विद्यार्थी चांगल्या गुणांनुक्रमाने उत्तीर्ण झाले.

या परीक्षेमध्ये कु समृद्धी तोर ऋषिकेश जाधव, यशश्री जोशी, आनंद आतकरे, वेदिका लोखंडे, कृष्णा काळे, दिग्विजय कवळे, ईश्वरी फरताडे, करण खेडकर, वेदिका चांद्रे, सिद्धी हिंगे, वेदांत उबाळे, शिवराज हातमोडे, प्रतीक सूर्यवंशी, सृष्टी मुळे, कृष्णा यादव, पार्थ फलके, जानवी पोपळे, शौर्य दाभाडे, आदिती जाधव, अभिजीत पगारे, शिवम खरात, अथर्व लाड, पियुष शिंदे,



माधवी काळे, तलहा चाऊस, शिवम राठोड, सायली पघळ, अभिजीत तोर, विश्वजीत राऊत, अखिलेश शेळके, आदर्श चव्हाण, वैष्णवी पोपळघट, कार्तिकी पवार, श्रावणी जगताप, प्रतिक्षा राठोड इत्यादी विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवून संस्थेचे व शाळेचे नाव उज्वल केले, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह शिवाजीराव पंडित, संस्था पदाधिकारी विद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार, आदीसह शिक्षक वर्गाने अभिनंदन केले

## नगर नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नगर रोडवर अपघात वाढले- नितीन सोनवणे

बीड दि २६ (प्रतिनिधी)- शहरातील नगर नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या दरम्यान नुकतेच नवीन सिमेंट रोड झाल्याने वाहनांचा वेग धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. या रस्त्यावर येथून तिथून डिव्हायडर असल्यामुळे व वळण रस्ता नसल्यामुळे मोटरसायकलस्वार रॉंग साईडने धावत असून, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तहसील कार्यालय आणि जिल्हा न्यायालय या महत्वाच्या ठिकाणांच्या परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. असे अपघात घडू नये यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी नितीन सोनवणे यांनी केली आहे.

या रस्त्यावर टू-व्हीलर, फोर-व्हीलर तसेच मोठे ट्रक्स सुसाट वेगाने धावत असल्याने व जिल्हा न्यायालय परिसरात वर्दळ जास्त असल्याने अनेक अपघातांची नोंद झाली आहे.या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या वतीने नितीन सोनवणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. त्यात नगर नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या संपूर्ण रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

योग्य ठिकाणी बसवलेले स्पीड ब्रेकर वाहनांचा वेग ४०% पर्यंत कमी करू शकतात. पुण्यासारख्या शहरात शाळा परिसरात स्पीड ब्रेकर बसवल्याने अपघातांचे प्रमाण ६०% पर्यंत कमी झाल्याचे अभ्यासातून दिसून आले आहे. कमी वेगामुळे चालकांना प्रतिसाद देण्यासाठी जास्त वेळ मिळतो, पादचारी आणि कमकुवत रस्ता वापरणाऱ्यांची सुरक्षा वाढते. यामुळे अपघात रोखता येतात, ट्रॅफिक नियमांचे पालन वाढते आणि निवासी भागात ध्वनी प्रदूषणही कमी होते.हे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना पाठवण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी लवकरात लवकर स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी एकच मागणी व्यक्त होत आहे. स्पीड ब्रेकर आय आर सी नियमांनुसार योग्यरित्या बसवले जावेत, जेणेकरून अपघात रोखता येतील आणि रस्ते सुरक्षित राहतील, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त केली आहे.

# संपादकीय

## पेरले ते उगवले

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बाँम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही. पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे. पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

## एन.एम.एम.एस.परीक्षेत जिल्हा परिषद चौसाळा शाळेचे २८ विद्यार्थी उत्तीर्ण



चौसाळा दि २६(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यम शाळेतील २८ विद्यार्थी एन.एम.एम.एस परीक्षेत उत्तीर्ण झाले याबद्दल या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

सदा उत्तीर्ण या विद्यार्थ्यांना दर वर्षी १२ हजार रुपये प्रमाणे १२ वी पर्यंत शिष्यवृत्ती मिळणार आहे,या यशस्वी विद्यार्थी मध्ये तनुजा बाप्पाजी खाकरे,अदिती अतुल शिंदे, ज्ञानेश्वरी अमोल जगताप,अनुष्का कैलास तोडकर,आरती उत्तरेश्वर हांगे, साई त्र्यंबक वाघ, सोहम सुभाष नाईकवाडे, आदिती नितीन पवार, नंदनी लिंबाजी ढास, अभिषेक बबन गोरे, प्राची परशुराम खाकरे, दक्ष दत्तात्रय मोटे, प्रिया तानाजी काशीद, अस्मिता अनिल भोसले, हरीओम नागनाथ गायकवाड, शिवम ज्ञानेश्वर गणगे, प्रणव बलभीम सावंत, ज्ञानेश्वरी रवींद्र खैरे, सोहम दिगंबर जगदाळे, अभिषेक गणेश डोके, शुभम विशाल आंधळे, सानिका महादेव ढास, आरोही विष्णू तावरे, हिंदवी नानाभाऊ ढास, सोमेश्वरी भीमराव लोखंडे, संध्याराणी सचिन काळे ,श्रावणी सचिन शिंदे ,प्रतीक बाबासाहेब बोबडे उत्तीर्ण विद्यार्थ्यानं यांचा समावेश आहे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शाळेतील शिक्षक श्री. उद्धव घोडके , वैभव शिंदे, संतोष परतापुरे, ज्ञानेश्वर मस्के , योगानंद गांधले, श्रीमती. काकडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले,यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंम्पे शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे सर्व सदस्य यांनी विशेष अभिनंदन केले.

## प्रितमताई मुंडे यांना राज्यसभेवर संधी द्यावी–शेख इरशाद

बीड दि २६ (प्रतिनिधी)- डॉ. प्रितम ताई मुंडे या बीड जिल्ह्यासाठी एक भक्कम आणि सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी कधीही जात-पात किंवा भेदभावाचे राजकारण केले नाही. सर्व समाजाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करणाऱ्या नेत्या म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या पाठीशी पंकजा ताईंचा मजबूत पाठिंबा असून, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे आशीर्वाद व विचारांचा वारसा त्यांना लाभला आहे. तेव्हा प्रीतम ताई मुंडे यांना राज्यसभेवर संधी द्यावी अशी मागणी शेख इर्शाद यांनी केली आहे.



यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या दहा वर्षांत त्यांनी बीड जिल्ह्याचे प्रभावी नेतृत्व केले आहे. रेल्वे, रस्ते आणि इतर विकासकामांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले असून जनतेमध्ये त्यांच्या नेतृत्वाबद्दल प्रचंड विश्वास आणि प्रेम आहे. डॉ. प्रितम ताई मुंडे या बीड जिल्ह्यासाठी एक भक्कम आणि सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी कधीही जात-पात किंवा भेदभावाचे राजकारण केले नाही. सर्व समाजाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करणाऱ्या नेत्या म्हणून त्यांची ओळख आहे.जनतेचा ठाम विश्वास आहे की त्यांना पुन्हा संधी मिळाल्यास बीड जिल्ह्याचा विकास अधिक वेगाने होईल.डॉ. प्रितमताई मुंडे या बीड जिल्ह्यातून विक्रमी मतांनी निवडून आलेल्या पहिल्या महिला खासदार आहेत. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा हा जिल्हा असून त्यांच्या कार्याचा आणि जनतेच्या अपेक्षांचा मान राखत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या कामगिरीचा विचार करून त्यांना राज्यसभेवर संधी द्यावी, अशी नम्र पण ठाम मागणी शेख इरशाद अब्दुर रज़ाक, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष यांनी केली आहे.

## देव देश धर्मासाठी आयुष्य समर्पित करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर–रूपाली कचरे



माजलगाव (प्रतिनिधी)–माजलगाव येथे भारतीय जनता पार्टी च्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कीट्टी आडगाव मंडळाध्यक्ष रूपाली कचरे यांच्या निवासस्थानी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी रूपाली कचरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आठवणीला उजाळा देताना म्हटले की देव देश धर्मासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आपले संपूर्ण जीवन आत्म समर्पित केले.. आपल्या परिवाराचा देखील विचार न करता देशासाठी धर्मासाठी त्यांनी समर्पण भावनेने संपूर्ण जीवन समर्पित केले.. सावरकर हे प्रकार राष्ट्रभक्त ,भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील धगधगते अग्निकुंड, थोर क्रांतीकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होते . त्यांनी केलेला संघर्ष व देशासाठी समर्पित केलेले आयुष्य हे कोणीही विसरणार नाही. याप्रसंगी माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी , सरचिटणीस कैलास खुरपे पवन मोगरेकर, रमेश शेंडगे सिद्धेश्वर राठोड शहर उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर भाजपा नेते ईश्वर खुरपे, शहर चिटणीस , विनोद लड्डा ,मनोज कोरडे.युवा नेते संतोष सोळंके रवी वाकळे सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र शासन करिअर कट्टा राज्य नियोजन समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल रामेश्वर मोरे यांचा उद्योग मंत्र्याच्या हस्ते मुंबईत गौरव

माजलगाव दि.२६(प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा करिअर कट्टा उपक्रम. महाराष्ट्रा तील तरूणां च्या करिअरला दिशा देण्याचे काम करिअर कट्टाकडुन होत आहे.करिअर कट्टाचा पाचवा वर्धापन दिन. दि.२५ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर याठिकाणी पार पडला.या कार्यक्रमात गेली चार वर्ष करिअर कट्टामध्ये सातत्यपूर्ण काम करणारे,युथ आयकॉन रामेश्वर परमेश्वर मोरे यांची नुकतीच करिअर कट्टा राज्य नियोजन समन्वयक या प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल रविंद्र साठे(सभापती खादी ग्रामोद्योग, राज्यमंत्री दर्जा) यांच्या शुभहस्ते आणि राज्याचे उद्योग मंत्री मा.ना.उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.रामेश्वर मोरे हे



राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या संपर्कातून असुन त्यांनी विद्यार्थ्यांची साखळी करिअर कट्टाच्या माध्यमातून तयार केली आहे.महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा.यशवंत शितोळे यांच्या मार्गदर्शना खाली ते काम करत आहेत. या सत्कार सोहळ्या प्रसंगी मा.डॉ.नामदेव भोसले (सहसचिव,मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन), प्रफुल्ल पाठक(अध्यक्ष,सोलर सोसायटी ऑफ इंडिया), सचिन इटकर(क्षेत्रीय संचालक, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ), मंदार फणसे हे मान्यवर उपस्थित होते.या यशाबद्दल त्यांचे महाराष्ट्रभरातून अभिनंदन होत आहे.

## संत भगवान बाबांनी अध्यात्माबरोबरच समाज सुधारण्याचे महान कार्य केले

### ह.भ.प.सविताताई केकान महाराजांचे प्रतिपादन

बीड दि.२६ (प्रतिनिधी)- संत भगवानबाबांनी



अध्यात्म बरोबरच समाज सुधारण्याचे महान कार्य केले. भगवान बाबा यांनी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा बंद करून समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठीचे त्यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन झी टॉकीज फेम ह.भ.प. सविताताई केकान (मुंडे) महाराज यांनी केले. बीड येथे संत भगवान बाबा प्रतिष्ठान' वर आयोजित अखंड हरीनाम सप्ताहात सविताताई महाराज बोलत होत्या. 'सुखे खावे अन्न, त्याचे करावे चिंतन,त्याचे दिले त्यासी,पावे फळ आपणासी' या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी निरुपण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संत भगवानबाबा यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रसार आणि प्रचाराचे महान कार्य केले. अनिष्ट रूढी बंद करून समाजाला सन्मार्गाला लावण्याचे काम केले. अनिष्ट रूढी प्रथा परंपरा बंद करून सन्मार्ग दाखविला. शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले त्यामुळे निरक्षर असणारे लाखोंनी शिक्षण घेतले. बहुजन समाजातील वंचित समाजाच्या उद्धाराचे कार्य त्यांनी केले. भगवान बाबा यांनी दाखवून दिलेल्या मार्ग मार्गाने वाटचाल केल्यास जीवन उद्धरून जाईल.जीवनाचे कल्याण होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी ह.भ.प. केकान महाराज यांनी भगवानबाबा यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगितले. यावेळी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, गायनाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, प्राचार्य त्रंबक महाराज मातकर, नामदेव मुंडे, किसन महाराज माने, मनोज बोठे, श्रीराम महाराज सानप, शेळके महाराज, आश्रुबा सानप, विणेकरी बेबीताई दुधाळ, वाल्मिक म. चाटे, यांनी साथसंगत केली.कार्यक्रमास ह.भ.प. खरमाटे महाराज डॉ. विक्रम सारुक, प्राचार्य वसंत सानप, प्रा. आर. टी. गर्जे, विलास कुटे, बबनराव सानप, सुधाकर सानप, रामहरी घुले, महादेव घोळवे, नारायण नागरे, आदींसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

## सिद्धिविनायक अर्बनमध्ये स्वा. सावरकरांना अभिवादन

माजलगाव दि २६ (प्रतिनिधी)–सिद्धीविनायक अर्बन शाखा माजलगाव येथे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रखर राष्ट्रभक्त, थोर क्रांतीकारक आणि साहित्यिक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमीला पुष्पहार अर्पण करून व प्रतिमा पूजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना भाजपा मा. प्रदेश कार्यकारिणी सदस्य व सिद्धीविनायक अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील म्हणाले 'ने मजसी ने परत मातृभूमीला' 'सागरा प्राण तळमळला' यांसारख्या अजरामर काव्यांतून त्यांनी प्रकट केलेली देशभक्ती आणि अंदमानच्या काळकोठडीत सोसलेल्या असीम यातनांचे स्मरण यावेळी होते.सावरकरांचे प्रखर विचार आणि त्यांचे हिंदुत्व, समाजसुधारणा व विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे, अशा भावना यावेळी डॉ. पाटील यांनी उपस्थितांसमोर व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला रा. स्व. संघ माजलगाव तालुका संघचालक जगदीश साखरे, मा. सरपंच प्रल्हाद दळवी, भाजपा माजलगाव शहर उपअध्यक्ष अविनाश कांडुरे, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब घोडके युवा कार्यकर्ते चंद्रकांत देशमुख, लक्ष्मण नवले, मधुकरराव शिंदे, संतोष नांदुरकर, दिगंबर वाघमोडे व स्थानिक नागरिक आणि सावरकर प्रेमी उपस्थित होते.

## सामूहिक नृत्य स्पर्धांमध्ये वैजाळा येथील जि.प. प्रा.शा.जिल्ह्यात प्रथम




पाटोदा दि २६ ( प्रतिनधी)- स्काऊट गाईड भवन बीड येथे जिल्हास्तरीय समूहीक नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या मध्ये पाटोदा तालुक्यातील वैजाळा या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे .त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे या स्पर्धांमध्ये अनेक शाळा सहभागी झाले होत्या या मध्ये या सामुहिक नृत्य स्पर्धात जि.प.प्रा.शाळा वैजाळा बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवून, अभिमान वाटून, जिल्ह्यातून सर्व स्तरातून कौतुक होऊ लागले आहे. आणि या शाळेची निवड राज्यस्तरीय स्पर्धा साठी निवड झाली. मार्गदर्शक शिक्षण अधिकारी किरण कुंवर गट .शि.अधिकारी गव्हाणे साहेब,विस्तार अधिकारी रहिंज सर,दासखेड केंद्राचे केंद्र प्रमुख धांडे सर , केंद्रीय मुख्याध्यापक कोकाटे सर, शाळेचे मुख्याध्यापक वाघिरे सर आणि मार्गदर्शका अष्टपैलू व्यक्तिमत्व सुतार मॅडम चे आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शाळेच्या कामगिरी बद्दल वैजाळा शालेय व्यवस्थापन समिती आणि गावातील सर्व समस्त नागरीक यांनी शुभेच्छा देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## शनिवारी माजलगांव ते येहळेगांव पायी दिंडीचे प्रस्थान

माजलगाव, दि २६ (प्रतिनिधी): माजलगाव ते येहळेगाव पायी वारीचे प्रस्थान दि. २८ शनिवारी होणार असुन भाविक - भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शहरामध्ये दरवर्षी माजलगाव ते येहळेगांव पायी दिंडीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखिल दि. २८ ते ८ मार्च दरम्यान दिंडीचे आयोजन असुन शनिवारी सकाळी शहरातुन दिंडीचे प्रस्थान होणार असुन रामनगर छोटेवाडी येथे संतोष मुळी, कमलेश जाब्रस यांच्या शेतात दिंडीतील भाविकांकरीता नाष्ट्याची सोय करण्यात आलेली आहे. यानंतर ढालेगाव, पाथरी, मानवत, आंबेगांव, पेंडगाव, हाट्टा, गुंडा फाटा, बाराशिव, पुरजवळ, शिरड शहापुर, शिरळी मार्गे येहळेगांव गवळी व नंतर श्रीक्षेत्र येहळेगांव तुकाराम महाराज मठ येथे दि. ७ मार्च असा दिंडीचा पायी प्रवास असणार आहे. दि. ८ रविवारी रंगपंचमी दिवशी दिंडी परतीच्या मार्गे प्रवास करणार असल्याचे दिंडीचे अध्यक्ष अशोक रोडे, सेवक सतीश जोशी, बाबा देशमुख यांनी सांगीतले आहे.

## साक्षी - कृष्णाजी शुभविवाह थाटात संपन्न

माजलगाव दि.२६(प्रतिनिधी:- ढेकनमोहा सोसायटीचे चेअरमन बालाप्रसाद जाजु यांची पुतनी तर बीड येथील प्रतिष्ठित व्यापारी सत्यनारायणजी जाजू यांची मुलगी चि.सौ.का.साक्षी व धोतरजोडा आष्टी येथील स्व.शिवप्रसाद जी सारडा यांचे चि.कृष्णाजी यांचा शुभविवाह वृंदावन गार्डन येथे मोठ्या थाटामाटात व दिमाखात संपन्न झाला.याप्रसंगी वधुवरा शुभाशीर्वाद देण्यास अनेकांची उपस्थिती होती.

ढेकनमोहा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तथा गजानन सहकारी सुत गिरणीचे संचालक बालाप्रसाद रामधनजी जाजू यांची पुतनी तथा बीड शहरातील व्यंकटेश



हार्डवेअरचे संचालक सत्यनारायण रामधनजी जाजू यांची चि.सौ.का साक्षी हिचा विवाह धोतरजोडा आष्टी ता परतुर येथील स्व.शिवप्रसादजी मदनलालजी सारडा यांचे चिरंजीव व गोविंद सारडा यांचे बंधु चिरंजीव कृष्णाजी यांचा शुभविवाह निश्चित झाला होता.साक्षी-कृष्णा यांचा शुभविवाह दि.२२ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी बीड येथील वृंदावन गार्डन मोंढा बीड येथे मोठ्या उत्साही वातावरणात व थाटामाटात संपन्न झाला.शुभविवाह प्रसंगी नवदांपत्यास शुभाशीर्वाद देण्यास माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, सुभाषचंद्र सारडा,सत्यनारायण लाहोटी, संपादक गंमतभाऊ भंडारी, संतोष सोहनी आदिसह विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.यावेळी सर्व उपस्थितांचे चेअरमन बालाप्रसाद रामधनजी जाजू,सत्यनारायण रामधनजी जाजू,ओमप्रकाशजी तोतला, गोविंद सारडा,गोपाल धुत,गोविंद धुत, दुर्गेश बंग आदिंनी स्वागत केले.

## सरकारने भगवानगडावर सर्वात मोठे संत विद्यापीठ उभारावे–ॲड.गुणरत्न सदावर्ते

भगवानगड दि २६ (प्रतिनिधी) - प्रसिद्ध विधिज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते ड.डॉ.गुणरत्न सदावर्ते यांनी पाथर्डी येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना उपस्थित राहून आपली ठाम भूमिका मांडली. सरकारने भगवानगडावर सर्वात मोठे संत विद्यापीठ उभारावे अशी मागणी केली



या दौऱ्याची सुरुवात त्यांनी भगवान बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन केली.चिंचपूर येथे हॉटेल सह्याद्री पॅलेसचे उद्घाटन,व उद्योजक डॉ.बंडूशेठ भांडकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.वरील सर्वच ठिकाणी त्यांनी सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीवर सडेतोड भाष्य केले.यावेळी ड.जयश्री सदावर्ते,ड.प्रताप ढाकणे,एसटी कर्मचारी बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर,उद्योजक बंडूशेठ भांडकर,सुभाष खेडकरड दिनकरराव पालवे,मा.सभापती गहीनिनाथ शिरसाट,विष्णुपंत ढाकणे,भगवानराव दराडे,रनजीत बेळगे,कैलास कराड,आजिनाथ खेडकर,एसटी बँक संचालक,संजय घाडगे,आजित मगरे,आतुल सितापराव,राजेश पानपाटिल,संध्या दहिफळे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना सदावर्ते म्हणाले की,ओबीसी समाज,वंचित घटक यांना कोणीही ट्रोल करत असेल किंवा त्यांच्यावर अन्याय होत असेल तर आम्ही गप्प बसणार नाही.प्रत्येक वेळी संविधानिक आणि कायदेशीर मार्गाने ठोस उत्तर दिले जाईल,असा इशाराही त्यांनी दिला. मराठा समाजाची दिशाभूल करीत राज्यातील सामाजिक वातावरण कलुषित करून ओबीसी,वंचित व इतर जातींचा कायम अपमान करणाऱ्या मनोज जरांगेला तात्काळ अटक करण्याची मागणी ॲड.गुणरत्न सदावर्ते यांनी केली. ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या कार्याचा उल्लेख करताना सदावर्ते म्हणाले की, श्री क्षेत्र भगवानगडासाठी सरकारने किमान एक हजार एक्कर जमीन द्यावी आणि त्या ठिकाणी भारतातील सर्वात मोठे संत विद्यापीठ उभारावे ही काळाची गरज आहे. यामुळे संत परंपरा,सामाजिक समता आणि संविधानिक मूल्यांचा प्रसार होईल,असेही त्यांनी नमूद केले

## स्वा.सावरकरांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

माजलगाव (प्रतिनिधी:- सिद्धीविनायक अर्बन शाखा माजलगाव येथे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रखर राष्ट्रभक्त, थोर क्रांतीकारक आणि साहित्यिक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमीला पुष्पहार अर्पण करून व प्रतिमा पूजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना भाजपा मा. प्रदेश कार्यकारिणी सदस्य व सिद्धीविनायक अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील म्हणाले 'ने मजसी ने परत मातृभूमीला' 'सागरा प्राण तळमळला' यांसारख्या अजरामर काव्यांतून त्यांनी प्रकट केलेली देशभक्ती आणि अंदमानच्या काळ कोठडीत सोसलेल्या असीम यातनांचे स्मरण यावेळी होते.

सावरकरांचे प्रखर विचार आणि त्यांचे हिंदुत्व, समाज सुधारणा व विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे, अशा भावना यावेळी डॉ. पाटील यांनी उपस्थितांसमोर व्यक्त केल्या.या कार्यक्रमाला रा.स्व.संघ माजलगाव तालुका संघचालक जगदीश साखरे, सरपंच प्रल्हाद दळवी, भाजपा माजलगाव शहर उपअध्यक्ष अविनाश कांडुरे, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब घोडके युवा कार्यकर्ते चंद्रकांत देशमुख, लक्ष्मण नवले, मधुकरराव शिंदे, संतोष नांदुरकर, दिगंबर वाघमोडे व स्थानिक नागरिक आणि सावरकर प्रेमी उपस्थित होते.

## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ : जिल्हा वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान

बीड दि.२६(प्रतिनिधी):- जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेने दि. ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान २०२६ प्रभावीपणे राबविले.या अभियानांतर्गत जिल्हा वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पुढाकार घेत वाहनधारकांसाठी विशेष वाहतूक नियम प्रबोधन शिबिराचे आयोजन केले. रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन व अपघात प्रतिबंध याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.हे अभियान उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे व सखाराम घोलप यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यात रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी वाहतूक शाखेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बारगजवाडीत चोरट्यांनी घराची भिंत फोडून केला १ लाख ६८ हजारांचा ऐवज लंपास



शिरूर कासार दि २६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील बारगजवाडी येथील घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवार दि.२२)रोजी मध्यरात्री घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असून पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. शिरूर कासार तालुक्यातील बारगजवाडी येथील रहिवाशी असलेल्या द्रोपदाबाई बाळासाहेब मिसाळ (वय७०) ह्या व त्यांचे पती जेवण करून रविवार (दि २२) रोजी रात्री १० च्या सुमारास घरासमोरील पडवीत मागच्या घराला कुलूप लावून झोपले असता मध्यरात्री त्यांच्या घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील चार ग्रॅमचे वेलजोड अंदाजे किंमत ३३६१०,एक ग्रॅमचे हुजूर जोड अंदाजे किंमत ७६००, दोन ग्रॅमचे ४९ मणी अंदाजे किंमत १५४००,दिड ग्रॅमची बुगडी अंदाजे किंमत ११६०० व १,००,००० लाख रुपये रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना सोमवार दि.२३ रोजी सकाळी ०६ च्या सुमारास मिसाळ दाम्पत्याच्या निदर्शनात आली. त्यानंतर शिरूर पोलिसांना घडलेल्या घटनेची माहिती देत अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपास पो.अं.एस.जी.खाडे हे करत आहेत.

# तिर्थक्षेत्र मोगऱ्यात पंढरी अवतरली



## रविवारी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

माजलगाव दि.२६ (प्रतिनिधी): तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मागील बारा वर्षापासुन आयोजित केला जातो. यंदाही दि.२२ फेब्रुवारीपासुन सप्ताहास सुरूवात झाली असुन विवीध धार्मिक कार्यक्रमांनी पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री, शि. भ. प. शिवाजी म. भरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात कथा प्रवक्ते ह.भ.प. बाळु म. उखळीकर हे असुन तबला साथ दौलत म. वगरे, हार्मोनियम वादक परमेश्वर महाराज, गायक ह.भ.प. शिवाजी म. देवकते, बुलबुल वादक जय म. सकळकर यांची साथसंगत आहे. ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. सौ. बबीताताई महालिंग भरडे, सौ. सुनिता सतिष पांचाळ, सौ. सरोजताई सुधाकर गोसावी, काकडा नेतृत्व ह.भ.प. गोपाळ म. देशमुख, शाहुराव सातपुते, बाबुराव शेजुळ, दौलत म. वगरे, रामहारी शिंदे, संदिपान माकले, विठ्ठल पांढरपोटे, नवनाथ सावंत, सतिष पांचाळ, चत्रभुज खामकर, महालिंग भरडे, नवनाथ इंगळे, श्रीपती नाईकनवरे, खंडु मोरे, महादेव सावंत, श्रीहरी शिंदे हे तर हरिपाठ नेतृत्व ह.भ.प. सचिन म. काष्टे, दौलत म. वगरे, उमेश. हाके हे करत आहेत. यात पहिल्या दिवशी ह.भ.प. कालिदास म. नाईकनवरे यांचे तर ह.भ.प. अनिल म. माखले, ह.भ.प. माउली म. खडकवाडीकर, ह.भ.प. भागवत म. नखाते, ह.भ.प. राजेंद्र म. गोंदीकर यांचे हरिकिर्तन झाले असुन ह.भ.प. सोनालीताई फडके, यांचे हरिकिर्तन होणार आहे तर दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन या महाप्रसादाचा लाभ भाविक - भक्तांनी घ्यावा असे आहे संतोष शेठ दुगड बंधु व समस्थ ग्रामस्थ मोगरा यांचे वतीने करण्यात आले आहे तर पंचक्रोषीतील अनेक भावीक भक्त, पुरूष मंडळी या सत्संगाचा लाभ घेत आहेत.

# भगवान बाबा प्रतिष्ठान येथे वंजारी समाजाचा रविवारी वधु-वर राज्यस्तरीय परिचय मेळावा

बीड (प्रतिनिधी): मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर, श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान, वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु-वर परिचय मेळावा तसेच मातृभूमी राज्यस्तरीय आदर्शरत्न पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायं.५ दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सदरील मेळवा संपन्न होणार होता, परंतु प्रशासकीय कारणाने सदरील मेळावा हा याच दिवशी श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान, बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी केले आहे.

मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन महंत ह.भ.प.राधाताई महाराज आईसाहेब यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे हे असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून कल्पतरु प्रतिष्ठानच्या सचीव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या सकाळच्या प्रथम सत्रामध्ये सकाळी १०.३० ते १२.३० या कालावधीत वंजारी समाज महाराष्ट्र वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार असून त्यानंतर शैक्षणिक, संशोधन, कला, क्रीडा, साहित्य, कीर्तन, सांस्कृतिक, शौर्य, योगा, आरोग्य, राजकीय, सामाजिक, प्रशासन, पत्रकारिता, स्पर्धा परिक्षा सह आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना मातृभूमी राज्यस्तरीय आदर्शरत्न पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सकाळी पहिल्या सत्रात कार्यक्रमस्थळी सकाळी ०९ ते ०१ या दरम्यान वधू-वर नोंदणी करण्यात येणार आहे. तर दुसर्या सत्रामध्ये दुपारी १२.३० ते १.३० वा. स्नेहभोजन त्यानंतर दुपारी १.३० ते ५.३० या कालावधीत वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत १५५० रेशीमगाठी जुळवून त्यांचे विवाह संपन्न झाले आहेत. तसेच प्रतिष्ठान मार्फत गेल्या १७ वर्षामध्ये विविध क्षेत्रातील जवळपास २ हजार गुणवंतांचा आतापर्यंत सत्कार केलेला आहे.

तरी वरील कार्यक्रमास समाज बांधव, शिक्षक, गुणवंत विद्यार्थी यांनी मोठया संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन संयोजन समितीच्यावतीने डॉ.संजय तांदळे, प्रा.ज्ञानेश्वर वाघ, रामदास हांगे, इंजि.उत्तमराव मिसाळ, प्रा.डी.जी.तांदळे, बाबा जायभाये, बाजीराव ढाकणे, पांडुरंग जायभाये, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, लक्ष्मण चाटे, प्रा.बिभीषण चाटे, राजेंद्र तिडके, मोहनराव सिरसाट, गणेश सानप, रवींद्र मुंडे, प्रा.अशोक नागरगोजे, श्रीराम ढाकणे, संतोष गर्जे, आत्माराम वाव्हळ, डॉ.लक्ष्मण पवळ, बाळासाहेब खाडे, उध्दव लाड आदींनी केले आहे.

## कृषी क्षेत्रातील सौर ऊर्जेच्या कामगिरीसाठी महावितरणला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड

मुंबई, दि. २५ : राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. २४) २०२६ च्या बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तब्बल १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मितीसाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठी गती दिली आहे. बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डसाठी रस्ते, बंदरे, वीज, शहरी वाहतूक, पाणी आदी ८ क्षेत्रांतील पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येते.यात वीज क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणची देशपातळीवर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

# स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

बीड (प्रतिनिधी) : बीड शहरातील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात कौटुंबिक हिंसाचार कायद्यावर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच उत्साहात संपन्न झाली. आय.एल.एस. विधी महाविद्यालय (पुणे), स्विस एड फाउंडेशन आणि युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित हा उपक्रम २५ व २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडला.

मराठवाडा विभागातील बालविवाह आणि कौटुंबिक हिंसाचार या विषयावर सन २०२३ ते २०२६ या तीन वर्षांच्या कालावधीत विशेष संशोधन करण्यात आले होते. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना लैंगिक समानता, बालविवाह रोखणे आणि कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध न्यायिक प्रक्रियेद्वारे लढा देण्याचे प्रशिक्षण देणे हा होता. या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सखी एक थांबा केंद्र आणि अनाथ आश्रम अशा विविध संस्थांना भेटी देऊन प्रत्यक्ष कामकाजाची माहिती देण्यात आली.

कार्यशाळेच्या सत्रात अंबाजोगाई येथील ॲड.कल्याणी विर्धे व लातूर येथील ॲड.सुजाता माने यांनी 'कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि विविध शासकीय-अशासकीय यंत्रणांची भूमिका' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. अन्यायग्रस्त महिलांना कायदेशीर संरक्षण कसे मिळवून द्यावे, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

# शिवजयंतीनिमित्त भव्य बॉक्स लंगडी स्पर्धा उत्साहात संपन्न




शिरूर कासार (प्रतिनिधी) : छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बॉक्स लंगडी असोसिएशन महाराष्ट्र राज्य आयोजित पहिली शिव छत्रपती बॉक्स लंगडी स्पर्धा बीड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडली. ही स्पर्धा मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या प्रशस्त मैदानावर आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत जिल्हाभरातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि संघभावना दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली.स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास तहसीलदार घोळवे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना खेळासोबतच शिक्षणातही प्रगती करण्याचा संदेश दिला. तसेच खेळामुळे शारीरिक आणि मानसिक विकास होतो, असे प्रतिपादन केले.

यावेळी मॉडर्न इंग्लिश स्कूलचे प्राचार्य माही सर, सामाजिक कार्यकर्ते भैरव भोसले,बीड जिल्हा बॉक्स लंगडीचे सचिव डोंगरे सर, सर्व प्रशिक्षकवर्ग तसेच मॉडर्न स्कूलचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या यशस्वी आयोजनाबद्दल बॉक्स लंगडी असोसिएशन महाराष्ट्र राज्य, भैरवनाथ सामाजिक प्रतिष्ठान व मॉडर्न इंग्लिश स्कूलचे सर्वत्र कौतुक होत असून, भविष्यात अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना उत्तम व्यासपीठ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्याच्या हालचाली

## प्रशासनाविरोधात शिवप्रेमी आक्रमक



गेवराई दि.२६ (प्रतिनिधी) : गेवराई शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटवण्याच्या हालचालींना वेग आला असून शिवप्रेमींनी या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. या प्रकरणी प्रशासन आणि स्थानिक रहिवासी यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. गेवराईतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नुकताच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, राष्ट्रनायक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा शिवप्रेमींनी गनिमी काव्याने एका रात्रीत बसवून अनावरण केले आहे. या ऐतिहासिक आणि भावनिक क्षणानंतर गेवराई शहरात आनंदाला उधाण आले आहे. मात्र आता नगरपरिषद प्रशासनाकडून हा पुतळा अन्यत्र हलविण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा रंगू लागली आहे. या पार्श्वभूमीवर गुरूवारी मोठया संख्येने शिवप्रेमी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकवटले होते. प्रशासनाच्या भूमिकेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ज्या ठिकाणी बसविण्यात आला आहे, तो तिथेच राहिला पाहिजे, हलविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, हा आमच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा प्रश्न आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नसून प्रत्येक मराठी माणसाच्या मनातील प्रेरणास्थान आहेत. त्यामुळे पुतळा हलविण्याच्या हालचालींमुळे भावनिक वातावरण अधिकच तीव्र झाले आहे. त्यामुळे आता प्रशासन यावर काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहरातील शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत या प्रश्नावर तोडगा निघणे गरजेचे आहे. जर पुतळा हटवला तर गेवराई शहर बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा शिवप्रेमी नागरिकांनी दिला आहे.


## जाहीरनामा

तमाम / सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित कारण्यात येते की, माझे पक्षकार नामे **डॉ. नारायण पि. श्रीमंतराव मुंढे** रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी मला दिलेल्या माहिती, अधिकार व सुचनेवरुन तसेच दाखविलेल्या कागदपत्रांवरुन हे जाहिर प्रगटन देण्यात येत असुन माझे पक्षकार यांच्या दिवंगत पत्नी नागे अश्लेषा भ्र. नारायणराव मुंढे यांनी तसेच साईनाथ पि. श्रीमंत मुंढे यांनी एकत्रीतरित्या मौजे बागपिंपळगांव ता. गेवराई जि. बीड येथे कंपनी अॅक्ट नुसार माऊली प्रिस्टेट काँक्रीट पाईप प्रा.लि. बागपिंपळगांव या नावाने कंपनी स्थापन केलेली असुन सदरील कंपनीमध्ये माझे पक्षकार यांच्या दिवंगत पत्नी नामे अश्लेषा भ्र. नारायणराव मुंढे या शेअर्स होल्डर असुन त्या पुर्वीच मयत झालेल्या आहेत. सदर कंपनीच्या मालकी व ताब्यात मौजे देवकी ता. गेवराई जि. बीड येथील सर्व्हे नं. ११८/३ मधील एकुण क्षेत्र ०३ हे २७ आर आकार, ०५ रु. ३२ पैसे पैकी ०२ हे. ४१ आर क्षेत्र आहे. ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

**पुर्वेस : भाऊसाहेब चोरमले, पश्चिमेस : डॉ.नारायण मुंढे**
**दक्षिणेस :जिजा देवकते, उत्तरेस : मिरा दत्तु बडे**

येणे प्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील मिळकत ही माऊली प्रिस्टेट कॉंक्रीट पाईप प्रा.लि. बागपिंपळगांव या कंपनीची असुन ज्यामध्ये माझे पक्षकार यांची दिवंगत पत्नी नाने अश्लेषा भ्र.नारायणराव मुंढे या शेअर्स होल्डर असुन त्यांच्या मृत्यु पश्चात मयताच्या कायदेशिर वारस या नात्याने माझे पक्षकार नामे डॉ. नारायणराव पि. श्रीमंतराव मुंढे तसेच त्यांच्या दोन मुली व दोन मुले है वरील नमुद माऊली प्रिस्टेट कॉंक्रीट पाईप प्रा. लि. बागपिंपळगांव या कंपनीचे व नमुद मिकतीचे शेअर्स होल्डर आहेत. तसेच सदर कंपनीचे दुसरे शेअर्स होल्डर नामे साईनाथ पि. श्रीमंत मुंढे हे वर नमुद मिळकत माझे पक्षकार यांना अंधारात ठेवुन त्यांच्या परोक्ष विक्री / हस्तांतर करण्याचे विचारात आहेत. त्यामुळे या जाहिर प्रगटनाद्वारे तमाम / सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, साईनाथ पि. श्रीमंत मुंढे यांचे बरोबर वर नमुद मिळकतीचा कोणीही खरेदी, ईसार अथवा कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये केल्यास माझे पक्षकार हे त्यांच्या विरुध्द योग्य त्या न्यायालयात योग्य ती कायदेशिर कार्यवाही दाखल करतील याची नोंद घ्यावी. सबब हे जाहिर प्रगटन.

दि.२६/०२/२०२६
गेवराई

जाहीर प्रगटन देणार
**ॲड.ए.आर.जैस्वाल**
दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई ता.गेवराई जि.बीड.
मो.९८८१३७७७२४

## जाहीरनामा

### विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत

**जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, संदर्भ क्र. (४) येथील अर्जान्वये अर्जदार यांनी खालील नमुद बाळाच्या/व्यक्तीच्या जन्मनोंदीबाबत विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. अर्जान्वये अर्जदार यांचे कुटुंबातील व्यक्तीची / बाळाची जन्मतारीख व जन्मठिकाण खालीलप्रमाणे आहे.

**१) बाळाचे/व्यक्तीचे नांव : यासेर याकुब मोमीन, अर्जदाराशी असलेले नाते : अर्जदार यांचा मुलगा, जन्म तारीख: १४/०१/२०१६, जन्म ठिकाण : पात्रुड**

प्रकरणात उक्त नमुद व्यक्तीची / बाळाची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **पात्रुड** यांचे नोंदवहीत उपलब्ध नसल्याने त्याबाबत जन्म नोंदवहीमध्ये घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळण्याचे अनुषंगाने ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक, जन्म/मृत्यू नोंदणी, **ग्रामपंचायत कार्यालय, पात्रुड** ता. माजलगांव जि. बीड यांना आदेशित करण्याकरिता विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत व्यक्तीने या कार्यालयात हजर राहुन / अर्ज सादर करुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखल केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत पुढील विहित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी माजलगांव

## जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **दिनेश प्रकाश कदम**, रा.अशोक नगर, बार्शी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि.बीड येथे आहे. ती जमीन भाऊ अशोक प्रकाश कदम, आई सुनंदा प्रकाश कदम आमचे नावे आहे. संपुर्ण जमीन ही आम्हा तिघांमध्ये ६५ गुंठे आहे गट नं. १४ मध्ये एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील लोकांची जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सोनु सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सोनु सुंदर कदम काही दिवसापुर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभुल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवुन ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बाबींसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व माझा भाऊ अशोक प्रकाश कदम, आई सुनंदा प्रकाश कदम आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देणार.

जाहीर प्रगटन देणार
**दिनेश प्रकाश कदम**
मो.९०७५४६६८०८

16632/12983

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशील माजलगाव खंडबहु उद्देशीय मागासवर्गीय सहकारी संस्था मर्यादीत माजलगाव ता. माजलगाव जि. बीड (अध्यक्ष) राजेभाऊ हरिभाऊ थोरात याच्या मालकी व ताब्यातील शिवार मौजे वडवणी ता. वडवणी जि.बीड हद्दीतील गट/सर्व्हे नं. ४१४ मधील एकुण क्षेत्रफळ ०० हे.८० आर जमीन आहे. ज्याची चतु:सिमा पुर्वेस विक्रेतीची बाकी राहिलेली जमीन, पश्चिमेस भगवढ=ढ उजगरे, गफुर पठाण व सलीम दिलावर वगैरेची जमीन, दक्षिणेस मुसा हुसेन व गेना चांदुजी पाटुळे वगैरेची जमीनव उत्तरेस राजेसाहब व बुवासाहेब पि. रामभाऊ शिंदे यांची जमीन अशी आहे.

सदर मिळकतीशी माझ्या मालकी व ताब्यातील आजुबाजुचे गटातील शेतकरी सदर जमीनीमध्ये अतिक्रमण करुन शेती विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत व सदर जमीनीमध्ये प्लॉटींग विक्री करण्याचा देखील ठराव करीत आहेत. सदर मिळकती संदर्भात चुक, खोटे , बोगस, बेकायदेशीर कागदपत्रे तयार करुन ते खोटे व बनावट असल्याची माहिती असतांना ते खरे आहे असे भासवुन सदर मिळकत बेकायदेशीररित्या व विनाताबा हस्तांतरीत करू पाहत आहेत. त्यामुळे सदरच्या मिळकतीशी त्याचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध नाही. तसेच इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र, आमुख्त्यारपत्र इ. स्वरुपाचे कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये अन्यथा आपणावर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येईल त्याच्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक : २६/०२/२०२६

**जाहीर प्रगटन देणार**
माजलगाव खंडबहु उद्देशीय मागासवर्गीय सहकारी संस्था मर्यादीत
माजलगाव ता. माजलगाव जि.बीड (अध्यक्ष) राजेभाऊ हरिभाऊ थोरात,
वय : ४६ वर्षे, धंदा मजुरी रा.सावरगाव ता. माजलगाव जि.बीड

मार्फत
**ॲड.एस.आर. सय्यद,**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव

## महाराष्ट्र शासन

### सार्वजनिक बाधकाम विभाग, अंबाजोगाई

**(दुरध्वनीक्र.०२४४६-२४७७६०)**
**ई-मेल:** ambejogai.cc@mahapwd.gov.in
**दुरध्वनी/फॅक्स क्र.: (०२४४६) २४७७६०/२४९५७५**
**ई-निविदा सुचना क्र.: ब-१एबीजे-१६/२०२५-२६ (ऑनलाईन)**

**(खुली निविदा)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा, मागवित आहेत. या ई निवदामध्ये रस्त्यालगत व सा.बा. इमारती परिसरात वृक्षलागवडीच्या तसेच धारुर तालुक्यातील ०२ आणि परळी तालुक्यातील ०१ कामाचा समावेश आहे. सदर ब-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत ई निविदे बाबतचा इतर संपूर्ण तपशील खालील संकेतस्थळावर (Web Site) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**सुचना :**

१. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://mahatenders.gov.in या Portal वर enrolled करावे.
२. कोणत्याही किंवा सर्व कामाच्या ई-निविदा, कोणतेही कारण न देता रद्य करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
३. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
४. ई-निविदा ऑनलाईन सादर करावयाच्या प्रक्रियेत कोणत्याही कारणामुळे अडथळा आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.
५. वरील ई-निविदा सुचना ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वेब साईटवर www.mahapwd.com पहावयास मिळेल.

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई

# पार्श्वभूमी

दि.२७ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार पान ६

## विज्ञानाला धर्म मानणारे सावरकर होते– डॉ.बाहेगव्हाणकर

बीड (प्रतिनिधी) सशस्त्र क्रांतीची मशाल हाती घेऊन युवकांना स्वातंत्र्य कार्यासाठी प्रेरित करणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे बुद्धी प्रामाण्यवादी होते. सावरकरांनी विज्ञानाला धर्म मानले असे प्रतिपादन सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले.स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मसमर्पण दिनानिमित्त सावरकर महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, सावरकर विद्यालय स्थानिक समितीचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी कर्मकांडाला



विरोध केला, जुन्या कालबाह्य रूढी,परंपरा याचा त्याग करा असा आग्रह त्यांनी धरला होता. पान २ वर

# सरपंचाच्या कुटूंबातील सदस्याचे शासकीय जमिनीवर अतिक्रमण

**माजलगांव दि.२६(प्रतिनिधी):– तालुक्यातील वांगी बु. येथील सरपंचाच्या कुटूंबातील सदस्याने शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले याबाबत तहसिलदारांनी अतिक्रमण काढुन घेण्याबाबत सांगुन देखिल सरपंचाने हे अतिक्रमण काढले नाही. परिणामी जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंचावर अपात्रतेची कारवाई केली आहे.**

## वांगी बु.येथील सरपंचास जिल्हाधिकाऱ्यांनी केले अपात्र

तालुक्यातील वांगी - बु, ता. माजलगांव, जि. बीड येथील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक ही २०२३ साली पार पडली. तसचे सरपंच पद हे थेट जनतेतुन असल्याने अजय गुलाबराव जाधव यांची सरपंच म्हणुन निवड झाली. मात्र सरपंच यांच्या आई यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून त्यावर बांधकाम देखील केलेले होते. तसेच सदरील अतिक्रमणाची नोंद ही ग्रामपंचायतीच्या अतिक्रमण नोंद वहीमध्ये सन १९९९ पासुन अस्तित्वात आहे. सदरील अतिक्रमण हटविण्याबाबत ग्रामपंयाचत कार्यालयाने मा. तहसिलदार साहेब यांच्या निर्देशानुसार संबंधित अतिक्रमण धारक यांना नोटिस देखील बजावण्यात आली होती, मात्र तरी देखील सरपंच यांच्या आई यांनी सदरील अतिक्रमण काढुन घेतले नाही. त्यानंतर तक्रारदार श्री. वैजनाथ उत्तमराव जाधव, रा. वांगी-बु, ता. माजलगांव, जि. बीड यांनी मुंबई उच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. ईश्वर वाघ यांच्या मार्फत मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयारत ग्रामपंचायत अधिकनियम १९५८ च्या कलम १४ (ज) (३) प्रमाणे रितसर तक्रार दाखल केली. सदरील तकारीच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना नोटिसा बजावुन, प्रत्यक्ष स्थळाचा पंचनामा करण्याचे निर्देश दिले. पंचनाम्यामध्ये संबंधित शासकिय जमिनीवर सरपंच यांच्या आईचे अतिक्रमण आढळुन आले, मात्र सरपंच यांचे पद वाचविण्यासाठी त्यांचे काही नातेवाईक यांनी सदरील अतिक्रमण हे सरपंच यांच्या आईचे नसुन त्यांचे आहे असे सांगु लागले, मात्र मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी अभिलेखावरी सर्व कागदपत्रांचा, पंचनाम्याचा, स्थळ पाहणी अहवाल, तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या जनाबाई विरूध्द महाराष्ट्र शासन या निकालातील निष्कर्षांचा सखोल विचार करून सरपंच यांनी त्यांच्या कुटुंबीयांमार्फत शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेले सिध्द झाल्याने सरपंच यांना ग्रामपंचायत अधिकनियम १९५८ च्या कलम १४ (ज) (३) नुसार पदावरून अपात्र घोषित केले.

## आज श्री क्षेत्र नारायणगडावर शिवजन्मोत्सव सोहळा

खालापुरी दि.२६(प्रतिनिधी):–महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगडावर आज दि. २७ फेब्रुवारी रोजी शिव जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या दिमागदार होणा–या सोहळ्याला मराठा संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील व जिजाऊंचे वंशज शिवाजी राजे जाधव यांची उपस्थिती राहणार असून मठाधिपती शिवाजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली होत असुन प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध व्याख्याते शिवचरित्रकार यशवंत गोसावी सर तर उत्तराधिकारी संभाजी महाराज यांची उपस्थिती राहणार आहे सकाळी ११ वाजता शिवजयंती सोहळ्याची सुरुवात होणार असून या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाटोदा-आष्टीत २००२ उमेदवारांपैकी ८१९ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र

### १ मार्चपासून पाटोदा येथे

पाटोदा दि.२६(प्रतिनिधी):– पोलीस पाटील भरती प्रक्रियेचा पुढील महत्त्वाचा टप्पा आता सुरू होत असून उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने मुलाखतींसाठी व्यापक तयारी केली आहे. आष्टी येथे पार पडलेल्या लेखी परीक्षेनंतर आता पात्र उमेदवारांच्या मुलाखती १ मार्चपासून पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहेत.

विवेक जॉनसन यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी येथे सहा केंद्रांवर घेण्यात आलेल्या परीक्षेस



पाटोदा व आष्टी तालुक्यातील २४६ गावांमधील एकूण २००२ उमेदवारांनी पान २ वर

**पोलीस पाटील हे गावपातळी वरील अत्यंत जबाबदारीचे पद आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष राहील यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. प्रत्येक उमेदवाराला समान संधी देत**



**गुणवत्ता आणि पात्रते च्या आधारेच निवड केली जाईल. उमेदवारांनी वेळेत उपस्थित राहून आवश्यक कागद पत्रे सोबत आणावीत, असे आवाहन त्यांनी केले.**

**श्रीमती वसीमा शेख**
**उपविभागीय अधिकारी पाटोदा**

## वनमंत्री नाईक यांनी सभागृहाची दिशाभुल केली ; कागदोपत्री झाडे लावू या अन् विक्रम करूया

### डॉ.ढवळेंचे अनोखे आंदोलन

बीड दि २६ (प्रतिनिधी)–बीड जिल्ह्यातील हरित बीड अभियान अंतर्गत वृक्षलागवड प्रकरणात वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात दिलेल्या माहितीतून दिशाभूल केल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते डॉ गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया या नावाखाली लक्षवेधी आंदोलन केले.

या वेळी आंदोलनकर्त्यांनी कागदावर झाडांची चित्रे काढत चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया असा उपरोधिक संदेश देत प्रशासनाच्या दाव्यांचा निषेध केला. निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत वनमंत्री गणेश नाईक, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना पाठविण्यात आले. आंदोलनात रामनाथ जमाले,शेख युनुस, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे पान २ वर

## वाघोऱ्याच्या सरपंच,ग्रामसेवक, बिडीओच्या नावाखाली आर्थिक लुट

## ग्रामरोजगार सेवकावर कारवाईची मागणी

### गटविकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

माजलगांव दि.२६(प्रतिनिधी):– तालुक्यातील वाघोरा ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवक शुभम भास्कर माने हे विवीध योजनेचे मस्टर काढण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक, बिडीओ यांना पैसे द्यावे लागतात असे भासवुन ग्रामस्थांची आर्थिक लुट करत असल्याने त्याचेवर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थ कोंडीबा लोंढे यांनी गटविकास अधिकाऱ्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामरोजगार सेवक शुभम माने हे वैयक्तिक सिंचन विहीर, घरकुल यासह विवीध शासकीय योजनांचे मनरेगातुन मस्टर काढण्यासाठी सतत पैशांची मागणी करतात तर पैसे न दिल्यास मस्टर काढत पान २ वर

# भीलखोरी तांडा येथील जलजीवन मिशन योजनेचे काम तात्काळ सुरु करून पूर्ण करा

### मागणीसाठी गढी–माजलगाव रस्त्यावर रस्ता रोको

सिरसदेवी, दि २६ (प्रतिनिधी)– गेवराई तालुक्यातील शिरसदेवी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या मौजे पांडुळ्याचीवाडी,भीलखोरी तांडा,यादव वस्ती येथील जल जीवन मिशन योजनेचे काम अर्धवट करून काम बंद केले असून हे काम तात्काळ चालू करून काम पूर्ण करण्याची मागणी भीलखोरी तांडा येथील ग्रामस्थांनी गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी गडी माजलगाव रोड या ठिकाणी रास्ता रोको करून मागणी केली आहे.

सविस्तर असे कि,तालुक्यातील सिरसदेवी अंतर्गत येणाऱ्या भीलखोरी तांडा, यादव वस्ती या गावासाठी जलजीवन मिशन योजना आली असून ही योजना १ कोटी ५५ हजार रुपयाची असून कंत्राट दाराने योजनेचे काम पूर्ण न केल्यामुळे जलजीवन मिशन कामाकडे दुर्लक्ष करत असून हे काम तात्काळ चालू करून संबंधित कंत्राट दाराचे नाव काळ्या यादीत टाकावे अशी मागणी भीलखोरी तांडा पान २ वर



## आरटीआय प्रवेशातील अंतराची जाचक अट रद्द करा

### जे.डी.शाह यांची मुख्यमंत्र्यांसह शिक्षण मंत्र्यांकडे मागणी

बीड - राज्य शासनाने आरटीआय (मोफत) २५% प्रवेश प्रक्रियेसाठी निवासा पासून १ किलोमीटर अंतराची जी अट घातली आहे, ती राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अन्यायकारक ठरत आहे. ही जाचक अट रद्द करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी समाजसेवक जे.डी.शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना लेखी पत्राद्वारे केली आहे.



मुख्यमंत्री तसेच शाळेय शिक्षणमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे राज्यस्तरावर ही गंभीर बाब राज्य सरकारच्या निदर्शनास आणुन देण्यात आली आहे. उदाहरण म्हणून बीड शहरा बाबत सांगायचे झाले तर, शहराचा विस्तार पाहता, येथील बहुतांश नामांकित

### फुले पिंपळगाव ग्रामपंचायत प्रकरण

# २ कोटींच्या कथित अपहार प्रकरणी चौकशीचे आदेश

माजलगाव दि.२६ (प्रतिनिधी)– माजलगाव तालुक्या तील फुले पिंपळगाव ग्रामपंचायतीच्या जनरल खात्यातून सुमारे २ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने स्थानिक प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश पंचायत समिती माजलगाव यांनी दिले असून, यासंदर्भातील अधिकृत पत्र २५ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतीच्या जनरल खात्यातून सरपंचांनी अनधिकृतरीत्या मोठी रक्कम काढून आर्थिक गैरव्यवहार केल्याची लेखी तक्रार पंचायत समितीकडे दाखल करण्यात आली आहे. तक्रारीची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित विस्तार अधिकाऱ्यांना तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.प्राथमिक माहितीनुसार, संबंधित रक्कम कोणतीही वैध प्रशासकीय मंजुरी न घेता खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे. ग्रामविकासासाठी राखीव असलेल्या निधीचा अशा प्रकारे अपहार झाल्याची बाब उघड झाल्याने गावकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. सार्वजनिक पैशांशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी नसावी, अशी ठाम भूमिका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तक्रारदारांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास मंत्रालयासमोर उपोषण आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात पान २ वर

### उच्च न्यायालयात याचिका

## छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी नको

बीड ( प्रतिनिधी):–बीड शहरामध्ये नागरीकांसाठी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे एकमेव सोईचे क्रिडांगण असून तिथे सकाळी व सायंकाळी ज्येष्ठ नागरीक, युवा तसेच खेळाडू हे फिरण्यासाठी, व्यायामासाठी, सरावासाठी मोठया प्रमाणात येत असतात. परंतू गेल्या काही वर्षापासून सदरील क्रीडांगण हे नगर परिषद बीड यांचेकडून भाडेतत्वावर दिले जाते. क्रिडांगणाचा वापर फिरण्यासाठी खेळाडूंना सरावासाठी होण्या ऐवजी नगर परिषद मोबदल्यासाठी राजकीय सभा, मनोरंजनाच्या कार्यक्रमाला देत असल्याचे दिसून आले आहे. सदरील क्रिडांगण हे एक–दोन दिवस नव्हे तर तब्बल २० ते २५ दिवसांसाठी आनंद नगरीसाठी देत आहे. हे समजल्या नंतर शहरातील सुजान पान २ वर

## द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात स्वा.सावरकर पुण्यतिथी साजरी

बीड दि.२६ (प्रतिनिधी)–राजस्थानी सेवा समाज द्वारा संचलित द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय लाहोटी एस.के., प्रमुख पाहुणे विद्यालयाचे उपमुख्याध्यापक हावळे ए.ए. पर्यवेक्षक मालपाणी एन. आर., प्रमुख वक्ते लड्डा एन.एस. या सर्वांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले ज्येष्ठ शिक्षक लड्डा एन. एस.यांनी सावरकरांचे विचार मांडताना लहानपणापासूनच सावरकरांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन देशप्रेम, त्याग



आणि धैर्य यांचे प्रतीक आहे. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान दिले असे प्रतिपादन केले. ज्येष्ठ कलाशिक्षक पान २ वर

## पोलीस पाटील भरतीच्या आजपासून मुलाखती

बीड दि. २६ (प्रतिनिधी)– बीड उपविभागातील पोलीस पाटील पदासाठी रिक्त असलेल्या एकूण ४३४ पदांसाठी दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. यातील उत्तीर्ण उमेदवारांच्या मुलाखती शुक्रवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे समजते. पोलीस पाटील या परीक्षेसाठी एकूण १८५९ उमेदवारांची बैठक क्रमांकानुसार यादी दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून ती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.दि. २७ फेब्रुवारी २०२६ ते १० मार्च २०२६ या कालावधीत लेखी परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत.या मुलाखती समाजकल्याण कार्यालय, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आल्या असून मुलाखतीदरम्यान उमेदवारांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

मुलाखतीच्या पहिल्या दिवशी १०० तर दुसऱ्या दिवसापासून दररोज २०० परीक्षार्थींना बोलाविण्यात येणार आहे. मुलाखतीच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पान २ वर

### वकीलाला मारहाण प्रकरण

## एका आरोपीला मिळाली तीन दिवसांची कोठडी

बीड दि २६ (प्रतिनिधी)– जिल्हा न्यायालयात वकील राम डोंगरे यांना मारहाण करणाऱ्या आरोपीविरुद्ध कडक कारवाई करण्याबाबत बार कॉन्सिल ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केल्यानंतर जागे झालेल्या शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने आरोपी राधाकिसन करपे याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. विशेष म्हणजे जिल्हा न्यायालयातील एकाही वकिलांनी त्याचे वकीलपत्र न घेता आपली एकजूट दाखवून दिली. दरम्यान या प्रकरणातील आणखी चार ते पाच आरोपी अदप देखील पोलिसांच्या हाती लागले नसल्याचे समजते.

बीड जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस करणारे ॲड राम डोंगरे हे आपले कामकाज करत बसले असताना दुपारी राधाकिसन करपे आणि तीन चार महिला आणि पुरुष त्यांच्याकडे आले. या लोकांनी अचानक बाचाबाची आणि शिवीगाळ करत वकील डोंगरे यांना मारहाण करण्यास सुरवात केली. त्यानंतर वकिलांनी हा सगळा प्रकार न्यायाधीश यांच्या कानावर घालून शिवाजीनगर पोलिसात धाव घेतली.तब्बल चोवीस तासापेक्षा अधिक काळ उलटून गेल्यानंतर देखील गुन्हा दाखल केला नसल्याने वकिलांनी न्यायालयाच्या दारात आंदोलन केले होते. तसेच या प्रकरणी महाराष्ट्र बार कॉन्सिल ने मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे धाव घेतली होती. पान २ वर